# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

मे २०२५

# विद्यावार्ता

ई - मासिक


## विद्यापीठात महाराष्ट्र दिन साजरा, उत्कृष्ट सेवा गौरव पुरस्कार वितरण सोहळा

✻ विशेषांक ✻







# विद्यावार्ता

ई - मासिक

# अनुक्रमणिका


- विद्यापीठात कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांचे हस्ते ध्वजारोहण १
- कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांचे भाषण ३
- विद्यापीठात कुलगुरूंचे हस्ते उत्कृष्ट सेवा गौरव पुरस्कार व वार्षिकांक स्पर्धा पारितोषिक वितरण समारंभ संपन्न ५
- विद्यापीठाच्या महिला विद्यार्थी संसद चमूचे राष्ट्रीय स्तरावर यश ७
- विद्यापीठाचे युनी कनेक्ट मोबाईल ॲप कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांच्या हस्ते लॉंच ८
- शेतकरी आत्महत्येमागील मानसशास्त्रीय दृष्टीकोण तपासणे गरजेचे – कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते ९
- विद्यार्थी हिताच्या योजनांचा विद्यार्थ्यांनी लाभ घेण्याचे विद्यापीठाचे आवाहन १०
- सौर उर्जा व उर्जा संवर्धन क्षेत्रात विद्यापीठाचे दिशादर्शक कार्य – कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते ११
- कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी विद्यापीठातील सर्व कर्मचाऱ्यांशी साधला संवाद १३
- स्तनदा माता विद्यार्थीनींसाठी अमरावती विद्यापीठाचा महत्पूर्ण निर्णय } १४
- आजीवन अध्ययन विभागात स्किझोफेनिया : समज–असमज विषयावर व्याख्यान संपन्न } १४
- आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे अभ्यासक्रम समाजासाठी प्रेरक – आयुक्त रविंद्र ठाकरे १५
- पुस्तके माणसांचे मन समृध्द करतात – डॉ. वैभव मस्के १६
- जयंती विशेष १७
- बातमी कात्रणे २०





संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

मार्गदर्शक

डॉ. मिलींद बारहाते

मा. कुलगुरू, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

डॉ. महेंद्र ढोरे

मा. प्र- कुलगुरू, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

प्रकाशक

डॉ. अविनाश असनारे

कुलसचिव, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

संपादक

डॉ. विलास नांदुरकर

जनसंपर्क अधिकारी

https://www.sgbau.ac.in




# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाची सर्वच क्षेत्रात लक्षणीय कामगिरी - कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते विद्यापीठात कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांचे हस्ते ध्वजारोहण



ध्वजारोहण करतांना कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते

शिक्षण, कला, क्रीडा, साहित्य, संशोधन अशा सर्वच क्षेत्रात संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाने लक्षणिय कामगिरी केली आहे, विद्यार्थ्यांकरिता नवनवीन शैक्षणिक व प्रशासकीय इमारती डौलदारपणे उभ्या रहात आहेत, त्यामुळे विद्यार्थ्यांना वेगळाच असा आनंद मिळतो, असे प्रतिपादन विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी केले. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचा स्थापना दिन, महाराष्ट्र दिन आणि आंतरराष्ट्रीय कामगार दिनाचे औचित्य साधून विद्यापीठामध्ये १ मे रोजी कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांचे शुभहस्ते ध्वजारोहण करण्यात आले, त्याप्रसंगी मार्गदर्शन करतांना ते बोलत होते. ध्वजस्तंभाजवळ प्र–कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, विद्यार्थी विकास संचालक डॉ. राजीव बोरकर, श्री राजेश पिदडी, तर प्रांगणात सर्व प्रशासकीय व शैक्षणिक विभागप्रमुख, शिक्षक, अधिकारी, कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. संचालन शारीरिक शिक्षण व क्रीडा संचालक डॉ. तनुजा राऊत यांनी केले.

कुलगुरू पुढे म्हणाले, विद्यापीठ स्थापनेला ४२ वर्षे पूर्ण झाली आहेत. एका लहानशा रोपट्याचे आता वटवृक्षात रुपांतर होत आहे. विद्यापीठाने शिक्षण, संशोधन, कला, साहित्य, क्रीडा क्षेत्रात लक्षणीय कामगिरी केलेली आहे. पर्यावरण व ऊर्जा संवर्धनासाठी विद्यापीठाला मानांकित पुरस्काराने गौरविण्यात आले आहे विविध समारंभ, क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धा यासाठी प्रशस्त अशा बहुउद्देशीय सभागृह आणि आंतरगृह क्रीडा इमारतीचे नुकतेच मुख्यमंत्री ना.श्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या हस्ते भूमिपूजन झाले. त्यामुळे मोठी सुविधा होणार आहे.



ध्वजारोहण कार्यक्रमाला उपस्थित विद्यापीठातील सर्व संवैधानिक अधिकारी, शैक्षणिक व प्रशासकीय विभाग प्रमुख, अधिकारी, शिक्षक व कर्मचारी


ध्वजारोहणानंतर उपस्थितांना संबोधित करतांना कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते

ते म्हणाले, आदिवासी मुलींचे वसतीगृह इमारत व रासायनिक तंत्रशास्त्र विभाग विस्तारित इमारतीचे लोकार्पणही महामहीम राज्यपालांच्या हस्ते झाले. त्यामुळे विद्यार्थ्यांना आणखी सुविधा मिळाल्या आहेत. अमरावती जिल्हाला प्रथम महिला राष्ट्रपती आणि मा. सर्वोच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधिशाचा मोठा मान मिळाला आहे ही अतिशय अभिमानाची आणि गौरवाची बाब आहे. विद्यापीठात आदिवासी अध्यासन केंद्र देखील लवकरच सुरू केले जाणार आहे. यामुळे आदिवासी समुदायांच्या शैक्षणिक गरजा तसेच त्यांना उच्च शिक्षणाच्या संधी आणि स्वतंत्र सुविधा मिळण्यास मदत होईल. विद्यापीठाला रू. ३ लक्ष चा सी.एस.आर. फंड घरकुल इंडस्ट्रिजकडून मिळाला, अशाच प्रकारे जास्तीतजास्त सी.एस.आर. फंड विद्यापीठाला प्राप्त व्हावा, याकरीता सर्वांनी प्रयत्न करावे असेही ते म्हणाले.

विद्यापीठात दिव्यांगांसाठी बॅटरीवर चालणाऱ्या ट्रायसिकलची सुविधा उपलब्ध करुन दिली आहे, त्यामुळे दिव्यांग विद्यार्थ्यांना मोठी सुविधा मिळाली आहे. विद्यापीठात विविध प्रकारचे कार्यक्रम, व्याख्याने, कार्यशाळा, महिला सक्षमीकरणासाठी प्रयत्न, मेळघाटातील आदिवासी बांधवांमध्ये शासनाच्या विविध योजनांबाबत जनजागृती, लोकनाट्य महोत्सव, असे कार्यक्रम होतात, त्यामुळे ज्ञानदानात आणखी भर पडते.

एम.बी.ए. विभागाच्या ४२ विद्यार्थ्यांची विविध क्षेत्रातील नामांकित संस्था व कंपन्यांमध्ये निवड झाली आहे. महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे घेतल्या गेलेल्या परीक्षेमधून विद्यापीठ परिक्षेत्रातील विद्यापीठाचे विद्यार्थी आय.ए.एस. व आय.पी.एस. झाले आहेत. विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांनी कला, संशोधन, साहित्य, क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धांमध्ये घवघवीत यश संपादन केले आहे. एकंदरीत, विद्यापीठाची अशा सर्वच क्षेत्रात लक्षणिय कामगिरी झाली आहे, असेही कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते म्हणाले.


विद्यापीठातील निसर्गरम्य परिसर

# कुलगुरुंचे १ मे महाराष्ट्र दिनाचे भाषण

सर्वप्रथम महाराष्ट्र स्थापना दिन, विद्यापीठ वर्धापन दिन व आंतरराष्ट्रीय कामगार दिनाच्या मी शुभेच्छा देतो. आजच्या कार्यक्रमाला उपस्थित सर्वांचे मी स्वागत करतो. १ मे, १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली. स्थापना होऊन ६५ वर्षे पूर्ण झाली आहेत. ६५ वर्षांच्या कालखंडामध्ये महाराष्ट्र नावाप्रमाणेच देशामध्ये महाराज्य आहे. इतर राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्राने शिक्षण, कृषी, आरोग्य, उद्योग, रोजगार, रस्ते यांसह आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक व क्रीडा क्षेत्रात दैदिप्यमान प्रगती केली आहे. आपल्या राज्याला गौरवशाली इतिहास असून संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीसाठी अनेकांनी बलिदान दिले, त्या सर्व हुतात्म्यांना मी सर्वप्रथम अभिवादन करतो.

महाराष्ट्र केवळ राज्य नाही, तर ते एक संस्कृती आहे, एक इतिहास आहे आणि प्रेरणा आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या शौर्याची, महात्मा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या समाजसुधारणेची ही भूमी आहे.

आज विद्यापीठ स्थापनेला ४२ वर्षे पूर्ण झाली आहेत. १ मे, १९८३ रोजी लावलेल्या रोपट्याचे वटवृक्षात रुपांतर होत आहे. आपल्या विद्यापीठाने शिक्षण, संशोधन, कला, साहित्य, क्रीडा क्षेत्रात लक्षणीय कामगिरी केलेली आहे. पर्यावरण व ऊर्जा संवर्धनासाठी विद्यापीठाला मानांकित पुरस्काराने गौरविण्यात आले आहे

विद्यापीठाचा भौतिक विकास खूप मोठ्या प्रमाणावर झाला आहे. निसर्गरम्य परिसर आणि या परिसरामध्ये विविध शैक्षणिक व प्रशासकीय विभागाच्या इमारती डौलदार उभ्या आहेत. निसर्गरम्य परिसरात विद्यार्थ्यांना शिक्षण घेतांना एक वेगळा आनंद मिळतो. विविध समारंभ, क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धा यासाठी भव्य सभागृहाची आवश्यकता होती, ते बहुउद्देशीय सभागृह आणि आंतरगृह क्रीडा इमारत आपल्या विद्यापीठ परिसरात उभी होत आहे. नुकतेच त्याचे भूमिपूजन व कोनशीला अनावरण महाराष्ट्र राज्याचे लोकप्रिय मुख्यमंत्री ना.श्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले. हे सभागृह पूर्ण झाल्यानंतर विद्यापीठाच्या विकासात आणखी भर पडेल.

आदिवासी मुलींचे वसतीगृह इमारत व रासायनिक तंत्रशास्त्र विभाग विस्तारित इमारतीचे लोकार्पण महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल श्री.सी.पी. राधाकृष्णन यांचे शुभहस्ते व मा. सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती श्री भूषण गवई यांचे उपस्थितीत संपन्न झाले. विद्यापीठाचा भव्यदिव्य दीक्षांत समारंभ महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल श्री.सी.पी. राधाकृष्णन व मा. सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती श्री भूषण गवई यांचे उपस्थितीत नुकताच संपन्न झाला. मा. सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती म्हणून श्री भूषण गवई यांची निवड झाली असून १४ मे रोजी ते पदभार ग्रहण करणार आहेत. मी त्यांचे विद्यापीठाच्यावतीने मन:पूर्वक अभिनंदन करतो. अमरावती जिल्हामधून प्रथम महिला राष्ट्रपती व मा. सर्वोच्च न्यायालयाचे चिफ जस्टीस झाले आहे, हा आपल्या सर्वांसाठी गौरवाचा व अभिमानाचा क्षण आहे. आपल्या विद्यापीठाला नुकतेच शासनाने आदिवासी अध्यासन केंद्र स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे. विद्यापीठ परिक्षेत्रात आदिवासी बहुल क्षेत्र मोठ्या प्रमाणावर आहे. या केंद्रामुळे आदिवासी समुदायांच्या शैक्षणिक गरजा तसेच त्यांना उच्च शिक्षणाच्या संधी आणि स्वतंत्र सुविधा मिळतील. त्याद्वारे आदिवासी विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होण्यास मदत होईल.

विद्यापीठाचा २५५.७२ कोटींचा अर्थसंकल्प नुकताच मंजूर झाला आहे. अर्थसंकल्पात उत्पन्न आणि खर्चाची आकडेवारी दिली आहे, तसेच या अर्थसंकल्पामध्ये नाविन्यपूर्ण बाबींवर खर्च सुद्धा होणार आहे. कुलगुरू म्हणून माझी सर्वांना विनंती आहे की, आपण आपल्या विद्यापीठाचे उत्पन्न वाढविण्यावर भर द्यावा, जास्तीतजास्त निधी कसा मिळवता येईल, यासाठी प्रयत्न करावेत आणि महत्वाचे म्हणजे कमीतकमी खर्च करुन खर्चात बचत कशी होईल, याचा सुद्धा विचार करावा.

घरकुल इंडस्ट्रीकडून अमरावती विद्यापीठाला रू. ३ लक्ष चा सी.एस.आर. फंड मिळाला आहे. माझी सर्व विभागप्रमुखांना विनंती आहे की, आपण सुद्धा जास्तीतजास्त सी.एस.आर. फंड विद्यापीठाला प्राप्त व्हावा, याकरीता प्रयत्न करावेत.

विद्यापीठातील रिसर्च ॲन्ड इन्क्युबेशनला स्टार्टअप इंडिया सीड फंड योजनेंतर्गत २.५ कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. विद्यापीठात दिव्यांगांसाठी बॅटरीवर चालणाया ट्रायसिकलची सुविधा उपलब्ध करुन दिली आहे, त्यामुळे दिव्यांगांच्या येण्या–जाण्याकरीता सोय झाली आहे.

### कार्यक्रम

विद्यापीठात आंतरविद्याशाखीय विश्वकोष नोंदलेखन कार्यशाळा, भारतीय समाज : प्रश्न आणि आव्हाने विषयावर द्विदिवसीय राज्य अधिवेशन, आंतरराष्ट्रीय जल दिनानिमित्त एकदिवसीय राज्यस्तरीय कार्यशाळा, सामाजिक समता सप्ताह निमित्त विविध कार्यक्रम व व्याख्याने, मोत्यांची शेती विषयावर एकदिवसीय कार्यशाळा, योग प्रशिक्षणावर कार्यशाळा, माती चिकित्सा, महिला दिनानिमित्त सावित्रीबाई फुले आणि महिला सक्षमीकरण विषयावर राज्यस्तरीय कार्यशाळा, महिला सक्षमीकरण आणि लैंगिक समस्या विषयावर एकदिवसीय कार्यशाळा, मेळघाटातील आदिवासी बांधवांमध्ये शासनाच्या विविध योजनांबाबत जनजागृती, शारीरिक शिक्षणावर एकदिवसीय कार्यशाळा, ॲप्रेन्टीसशिप एम्बेडेड डिग्री प्रोग्राम, लोकनाट्य महोत्सव, शहीद दिनानिमित्त व्याख्यान, एकदिवसीय करीअर मार्गदर्शन कार्यशाळा, संत गाडगे बाबांची दशसूत्रे व ग्रामविकास विषयावर एकदिवसीय कार्यशाळा, गरजूंना वस्त्रदान, भारतीय ज्ञान प्रणाली शिक्षणाकडे एक समग्र दृष्टीकोन विषयावर राष्ट्रीय कार्यशाळा, भारतीय संविधानाच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त राष्ट्रीय परिसंवाद, शिवजयंती निमित्त राज्यस्तरीय कार्यशाळा, मराठी भाषा गौरव दिनानिमित्त मराठीचे भवितव्य विषयावर व्याख्यान, राष्ट्रीय विज्ञान दिवस कार्यक्रम, आयडीऐट २.० प्रि–इन्क्युबेशन फॉर स्टार्टअप कार्यक्रम, एल.ई.डी. लॅम्प फॅब्रिकेशन्स वर कार्यशाळा, नॉलेज लर्निंग मॅनेजमेंट सिस्टीम वर कार्यशाळा, वेदोत्सव कार्यक्रम, वुमेन्स स्टडीज सेंटरद्वारा परिसंवाद स्पर्धा, पदव्युत्तर शारीरिक शिक्षण विभागाद्वारा विद्यापीठ कर्मचायांकरीता क्रिकेट स्पर्धा आदी कार्यक्रम संपन्न झालेत. विद्यार्थ्यांच्या ज्ञानात भर पडावी, या उद्देशाने असे कार्यक्रम विद्यापीठात आयोजित केले जातात.

### पुरस्कार

एम.बी.ए. विभागाच्या ४२ विद्यार्थ्यांची विविध क्षेत्रातील नामांकित संस्था व कंपन्यांमध्ये निवड झाली आहे. महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे घेतल्या गेलेल्या परीक्षेमधून विद्यापीठ परिक्षेत्रातील विद्यापीठाचे विद्यार्थी आय.ए.एस. व आय.पी.एस. झाले आहेत, त्या सर्वांचे मी मनापासून अभिनंदन करतो. विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांनी कला, संशोधन, साहित्य, क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धांमध्ये घवघवीत यश संपादन केले आहे. संस्कृत ऑलंपियाड परीक्षेत विद्यापीठाच्या प्रा. श्वेता बडगुजर यांना सामाजिक प्रगत स्तराचा तृतीय पुरस्कार व प्रा. प्रियंका गावंडे यांना सामाजिक सरल स्तराचा प्रथम पुरस्कार प्राप्त झाला. अखिल भारतीय आंतर विद्यापीठ राष्ट्रीय कव्वाली स्पर्धेत विद्यापीठाच्या चमूने घवघवीत यश संपादन केले. सावित्रीबाई फुले विद्यापीठ, पुणे येथे नुकत्याच पार पडलेल्या उत्कर्ष, सामाजिक व सांस्कृतिक राज्यस्तरीय महोत्सवात विद्यापीठाच्या रासेयो विभागाच्या चमूची सर्वोत्कृष्टशिस्तप्रिय संघ म्हणून निवड झाली. आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त यशस्वी महिला उद्योजकांचा सन्मान करण्यात आला. अखिल भारतीय आंतर विद्यापीठ युवा महोत्सव स्पर्धेमध्ये विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कामगिरी करुन पदके व पारितोषिके मिळविलीत. सोलापूर विद्यापीठात आयोजित प्रेरणा शिबीरात विद्यापीठाचा रासेयो संघ सर्वोत्कृष्टठरला. विकसित भारत युथ पार्लमेन्टचे भव्य आयोजन विद्यापीठात संपन्न झाले, त्यामधून दहा विद्यार्थ्यांची राज्यस्तरीय युथ पार्लमेन्टकरीता निवड करण्यात आली. त्या विद्यार्थ्यांना संसदेत बोलण्याची संधी मिळणार आहे. राज्यस्तरीय आविष्कार स्पर्धेत विद्यापीठातील साहिल गावंडे व विवेक टोंगे यांना पारितोषिके प्राप्त झालीत. वुमेन्स स्टडीज सेंटरच्यावतीने घेण्यात आलेल्या शोधनिबंध लेखन व सादरीकरण स्पर्धेत ऋषाली इंदाणे, रोहन अंभोरे व गजानन व्यवहारे यांनी पारितोषिके मिळविलीत, त्या सर्वांचे मन:पूर्वक अभिनंदन.

विद्यापीठाचा उत्कृष्ट सेवा गौरव पुरस्कार विद्यापीठस्तरामध्ये वर्ग १ व २ अधिकारी, वर्ग ३ व ४ कर्मचारी, महाविद्यालयीन स्तरामध्ये प्राचार्य, शिक्षक व वर्ग ३ कर्मचारी यांना ससन्मान प्रदान झाला. याशिवाय कल्पना चावला युवा महिला संशोधन पुरस्कार व वार्षिकांक स्पर्धेतील बिगर व्यावसायिक (शहरी व ग्रामीण गट) महाविद्यालय तसेच व्यावसायिक (शहरी व ग्रामीण गट) महाविद्यालयांच्या वार्षिकांकास प्रथम, द्वितीय व तृतीय पारितोषिक देवून सन्मान झाला. त्या सर्वांचे मी कुलगुरू म्हणून अभिनंदन करतो. महाराष्ट्र दिन व विद्यापीठ वर्धापन दिनाच्या सर्वांना शुभेच्छा देतो.

**जय हिंद, जय महाराष्ट्र**

# पुरस्कार मिळालेल्यांची जबाबदारी वाढली - कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते

## विद्यापीठात कुलगुरूंचे हस्ते उत्कृष्ट सेवा गौरव पुरस्कार व वार्षिकांक स्पर्धा पारितोषिक वितरण समारंभ संपन्न



मार्गदर्शन करतांना कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते

विद्यापीठ व महाविद्यालयातील प्राचार्य, शिक्षक, अधिकारी, कर्मचारी यांना उत्कृष्ट म्हणून पुरस्कार मिळालेला आहे, मात्र एक आदर्श व्यक्ती म्हणून त्यांच्याकडे आता पाहिल्या जाणार असल्याने त्यांची जबाबदारी सुध्दा तेवढीच वाढली आहे, असे सांगून प्रत्येक प्राचार्य, शिक्षक, अधिकारी व कर्मचारी दिपस्तंभासारखे आहे, असे भावोद्गार विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी काढले. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचा स्थापना दिन, महाराष्ट्र दिन व आंतरराष्ट्रीय कामगार दिनाचे औचित्य साधून उत्कृष्ट सेवा गौरव पुरस्कार २०२४, कल्पना चावला युवा महिला संशोधक पुरस्कार व वार्षिकांक स्पर्धा २०२३-२४ चे पुरस्कार कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांचे शुभहस्ते प्रदान करण्यात आले, त्याप्रसंगी मार्गदर्शन करतांना ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, आंतरविद्याशाखीय अभ्यास विद्याशाखेच्या अधिष्ठाता डॉ.सौ.व्ही.पी. गुडधे, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ.एच.आर. देशमुख उपस्थित होते.

### उत्कृष्टसेवा गौरव पुरस्कार

उत्कृष्ट सेवा गौरव पुरस्कारांतर्गत शाल, श्रीफळ, गौरव प्रमाणपत्र व रौप्यपदक देवून कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयांतील सर्वसाधारण वर्गवारीत प्राचार्यांमधून उत्कृष्ट शैक्षणिक कार्य केल्याबद्दल व त्या माध्यमातून महाविद्यालयाला व पर्यायाने विद्यापीठाला उत्कृष्ट सेवा प्रदान केल्याबद्दल प्राचार्य डॉ. जयंत मधुकर चतुर, विद्याभारती महाविद्यालय, अमरावतीच्या प्राचार्य डॉ. प्रज्ञा एस. येनकर यांचा, संलग्नित महाविद्यालयांतील सर्वसाधारण वर्गवारीत शिक्षकांमधून उत्कृष्ट शैक्षणिक कार्य केल्याबद्दल व त्या माध्यमातून महाविद्यालयाला व पर्यायाने विद्यापीठाला उत्कृष्ट सेवा प्रदान केल्याबद्दल महाविद्यालयीन शिक्षक डॉ. दिपक केवळरामजी कोचे, महिला राखीव वर्गवारीत शिक्षकांमधून डॉ. पुनम टिकमचंद अग्रवाल,

विद्यापीठ प्रथम श्रेणी सर्वसाधारण वर्गवारीतील अधिकाऱ्यांमधून विद्यापीठाला उत्कृष्ट सेवा प्रदान केल्याबद्दल डॉ. विलास रामदासपंत नांदुरकर, विद्यापीठ व्दितीय श्रेणी सर्वसाधारण वर्गवारीतील अधिकाऱ्यांमधून श्री उमेश प्रभाकर लांडगे, विद्यापीठ व्दितीय श्रेणी महिला राखीव अधिकाऱ्यांमधून सौ. उमा प्रकाश चांभारे, विद्यापीठ तृतीय श्रेणी सर्वसाधारण वर्गवारीतील कर्मचा-यांमधून श्री प्रवीण रंगरावजी अलटकर, विद्यापीठ तृतीय श्रेणी महिला राखीव वर्गवारीतील कर्मचा-यांमधून सौ. प्रज्ञा किशोर बोंडे, विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयातील सर्व स्तरावरील शिक्षकेत्तर सर्वसाधारण वर्गवारीतील कर्मचाऱ्यांमधून श्री जयंत वसंतराव निखारे, चतुर्थ श्रेणी सर्वसाधारण वर्गवारीतील कर्मचा-यांमधून विद्यापीठाला उत्कृष्ट सेवा प्रदान केल्याबद्दल श्री गजानन निळकंठराव देशमुख यांचा


### कु. कल्पना चावला युवा महिला संशोधक पुरस्कार

कु. कल्पना चावला युवा महिला संशोधक पुरस्कार डॉ. प्रिती किशोर टवलारे यांचा कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांच्या हस्ते शाल, श्रीफळ, गौरव प्रमाणपत्र व रू. २५,०००/-- रोख देवून सत्कार केला.

### वार्षिकांक स्पर्धा

वार्षिकांक स्पर्धेत शहरी विभागांतर्गत बिगर व्यावसायिक गटात प्रथम क्रमांक भारतीय महाविद्यालय, अमरावतीच्या 'भारती' या वार्षिकांकास, द्वितीय क्रमांक श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय, अमरावतीच्या 'क्रिएशन' या वार्षिकांकास व तृतीय क्रमांक अमोलकचंद महाविद्यालय, यवतमाळच्या 'शब्दार्क' या वार्षिकांकास, ग्रामीण विभाग : बिगर व्यावसायिक गटात प्रथम क्रमांक इंदिरा महाविद्यालय, कळंबच्या 'कदंबिनी' या वार्षिकांकास, द्वितीय क्रमांक गो.सी. टोम्पे महाविद्यालय, चांदुरबाजारच्या 'फुलोर' या वार्षिकांकास व तृतीय क्रमांक फुलसिंग नाईक महाविद्यालय, पुसदच्या 'कल्पना' या वार्षिकांकास, शहरी व ग्रामीण विभागांतर्गत व्यावसायिक गटात प्रथम क्रमांक शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, अमरावतीच्या 'क्रेससिंडो' या वार्षिकांकास, द्वितीय क्रमांक प्रो.राम मेघे इन्स्टिट्युट ऑफ टेक्नॉलॉजी ॲन्ड रिसर्च बडनेराच्या 'मित्रा व्हायब्रोशन्स' या वार्षिकांकास व तृतीय क्रमांक सिपना कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग ॲन्ड टेक्नॉलॉजी, अमरावतीच्या 'इनोवेटर' या वार्षिकांकास कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांचे शुभहस्ते स्मृतिचिन्ह व गौरव प्रमाणपत्र देवून महाविद्यालयांना सन्मानित करण्यात आले.

कुलगुरू म्हणाले, पुरस्कार निवड समितीला निवड करतांना खूप कसरत करावी लागली. ज्या संस्थेत आपण कार्य करीत असतो, त्या मातृसंस्थेकडून गौरवान्वित होत असतांनाचा आनंद फार मोठा असतो. त्यामुळे आणखी चांगले कार्य करा, असे सांगून त्यांनी सर्व पुरस्कार प्राप्त व्यक्तींचे अभिनंदन करुन पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाची सुरुवात राष्ट्रगीत, महाराष्ट्र गीत व विद्यापीठ गीताने झाली. कर्मयोगी श्री संत गाडगे बाबांच्या प्रतिमेचे पूजन, पुष्पार्पण मान्यवरांचे हस्ते करण्यात आले. संचालन भांडार विभागाचे अधीक्षक श्री धनंजय पाटील यांनी, तर आभार जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर यांनी मानले. कार्यक्रमाला विद्यापीठ व्यवस्थापन परिषदेचे सदस्य डॉ. प्रवीण रघुवंशी, विविध प्राधिकारिणींचे सदस्य, संवैधानिक अधिकारी, शैक्षणिक व प्रशासकीय विभागप्रमुख, संलग्नित महाविद्यालयांचे प्राचार्य, शिक्षक, अधिकारी, कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



विद्यापीठातील पुरस्कारप्राप्त अधिकारी,शिक्षक व कर्मचारी



संलग्नित महाविद्यालयातील पुरस्कारप्राप्त प्राचार्य,शिक्षक व कर्मचारी



वार्षिकांक स्पर्धेतील विजेते महाविद्यालयांचे प्राचार्य व शिक्षक

# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या महिला विद्यार्थी संसद चमूचे राष्ट्रीय स्तरावर यश

## कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांच्याहस्ते सत्कार



यशस्वी महिला चमूंचा सत्कार करतांना कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते,
प्र–कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, विद्यार्थी विकास विभाग संचालक डॉ. राजीव बोरकर

अखिल भारतीय आंतरविद्यापीठ राष्ट्रीय महिला विद्यार्थी संसद स्पर्धा २०२४–२५ मध्ये संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या महिला विद्यार्थी संसद चमूने उत्कृष्ट कामगिरी करत तृतीय क्रमांक पटकावला. ही स्पर्धा सेन्चुरियन युनिव्हर्सिटी ऑफ टेक्नॉलॉजी अँड मॅनेजमेंट, ओडिसा येथे संपन्न झाली.

या उल्लेखनीय यशाबद्दल विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. मिलींद बारहाते यांनी महिला संसद चमूचे अभिनंदन केले आहे. कुलगुरू कार्यालयात झालेल्या छोटेखानी सत्कार कार्यक्रमात कुलगुरु डॉ. मिलींद बारहाते यांच्या हस्ते संपूर्ण संसद चमूचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी प्र–कुलगुरु डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, संचालक डॉ. राजीव बोरकर विद्यार्थी विकास विभाग आणि इतर मान्यवर उपस्थित होते.

पुरस्कार प्राप्त चमूमध्ये कु. श्रावणी रोटे, कु. नफिसा शब्बीर हुसेन, कु. आरिफा शब्बीर हुसेन यांचा समावेश होता. या स्पर्धेसाठी डॉ. अभिजित आणि डॉ. मृणाल महाजन यांनी संघ व्यवस्थापक म्हणून काम पाहिले.

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या महिला विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय स्तरावर मिळवलेले हे यश निश्चितच प्रेरणादायी असून इतरांनी सुद्धा प्रेरणा घ्यावी असे मत कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी याप्रसंगी व्यक्त केले.

# विद्यापीठाचे 'युनी कनेक्ट' मोबाईल ॲप

## कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांचे हस्ते लॉंच

## पाचही जिल्ह्यांमधील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांशी अमरावती विद्यापीठ सदैव 'कनेक्ट




विद्यापीठाने लॉंच केलेले ॲप

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासासाठी सातत्याने प्रयत्न सुरू आहेत. विद्यार्थी हिताच्या विविध योजना विद्यापीठाकडून राबविण्यात येत आहेत. त्यात आता विद्यापीठाच्या मोबाईल ॲप ची आणखी भर पडली आहे. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे 'युनी कनेक्ट' हे मोबाईल ॲप कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांचे हस्ते बुधवार दि. २१ मे, २०२५ रोजी लॉंच करण्यात आले आहे. या मोबाईल ॲपमुळे आता संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ परिक्षेत्रातील पाचही जिल्हांमधील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांशी जुळले असून विद्यार्थ्यांसह महाविद्यालयांचे प्राचार्य, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी त्याचबरोबर विद्यापीठाच्या सर्व शैक्षणिक व प्रशासकीय विभागप्रमुख, कर्मचा–यांनाही या मोबाईल ॲपमुळे मोठी सुविधा निर्माण झाली आहे. सदर मोबाईल ॲपमध्ये महाविद्यालयांची यादी, महाविद्यालये, विद्यापीठाच्या विभागाव्दारे उपलब्ध करुन देण्यात आलेले अभ्यासक्रम, अध्ययन, परीक्षांची वेळापत्रके, निकाल, मागील परीक्षांच्या प्रश्नपत्रिका, शैक्षणिक कॅलेंडर, परिपत्रके, सूचना, उपक्रम, विविध विद्यार्थी हितार्थ योजना, संशोधन, रोजगार, शिष्यवृत्ती आदींची विस्तृत माहिती अगदी सहजपणे एका क्लिकवर विद्यार्थ्यांना उपलब्ध होईल.

विद्यार्थ्यांची तंत्रज्ञानाबद्दल असलेली आवड लक्षात घेता सदर ॲपव्दारे आवश्यक ती शैक्षणिक आणि करिअर विकासासाठीची संसाधने एकाच प्लॅट फॉर्मवर एकत्र आणण्याचे यामागील उद्दिष्ट आहे. सदर ॲप केवळ शैक्षणिक माहितीपुरते मर्यादित न राहता विद्यार्थ्यांच्या करिअर विकासासाठी उपयुक्त संसाधने प्रदान करते. स्थानिक तसेच बाहेरील कंपन्यांमध्ये इंटर्नशिप, नोकरीच्या संधी शोधण्याची आणि त्यासाठी अर्ज करण्याची सुविधा देखील या ॲपवर उपलब्ध आहे.

सदर ॲप आय.ओ.एस. आणि अँड्रॉईड अशा दोन्ही प्लॅट फॉर्मवर डाऊनलोड करता येईल. विद्यार्थ्यांनी आपल्या मोबाईलवर ॲप डाऊनलोड केल्यानंतर त्यांचे महाविद्यालय, अभ्यासक्रम याबाबत नोंद करावयाची आहे. त्या नोंदीनुसार विद्यार्थ्यांना संबंधित माहिती अगदी सहजरित्या मिळू शकेल.

याप्रसंगी बोलतांना कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते म्हणाले, विद्यापीठाकडून विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासासाठी सतत प्रयत्न सुरू आहेत. विद्यार्थ्यांना पुस्तकी ज्ञानाबरोबरच रोजगाराभिमुख कौशल्य विकास व्हावा, यासाठी प्रयत्न केले जात आहेत, जेणेकरुन विद्यापीठातून शिक्षण घेऊन विद्यार्थ्यांना स्वत:च्या पायावर उभे राहता येईल. या मोबाईल ॲपमुळे विद्यार्थ्यांच्या समस्यांचे निराकरण देखील वेळीच करता येईल.



युनी कनेक्ट ॲपचे लॉंचिग करतांना कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते व इतर



ॲप तयार करणाऱ्या कंपनीच्या प्रतिनिधींशी चर्चा करतांना कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते व इतर

## शेतकरी आत्महत्येमागील मानसशास्त्रीय दृष्टिकोन तपासणे गरजेचे - कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते
## विद्यापीठात 'पश्चिम विदर्भातील शेतकरी आत्महत्या : कारणे व उपाय' यावर तज्ज्ञांचे चर्चासत्र




विचार व्यक्त करतांना कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते

पश्चिम विदर्भात शेतकरी आत्महत्या ही अतिशय दुर्दैवी बाब आहे. पश्चिम विदर्भात असलेल्या समस्यां आणि कर्नाटक राज्यातील समस्यां सारख्याच आहेत, मात्र तेथे शेतकरी आत्महत्येचे प्रमाण अगदी अत्यल्प आहे. त्यामुळे पश्चिम विदर्भातील शेतकरी आत्महत्येमागील मानसशास्त्रीय दृष्टिकोन तपासणे गरजेचे असल्याचे मत कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी व्यक्त केले. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांच्या मार्गदर्शनाखाली 'पश्चिम विदर्भातील शेतकरी आत्महत्या : कारणे व उपाय' या विषयावर संशोधन प्रकल्प राबविण्यात येत आहे. या अंतर्गत अमरावती विभागातील तज्ज्ञ अभ्यासकांची मते जाणून घेण्यासाठी व सदर विषयावर चर्चा करण्याच्या दृष्टीने विद्यापीठातील डॉ. पंजाबराव देशमुख विभागीय अर्थव्यवस्था अध्ययन व नियमन केंद्राच्यावतीने आयोजित करण्यात आलेल्या पश्चिम विदर्भातील शेतकरी आत्महत्या : कारणे व उपाय यावर चर्चासत्रावेळी मनोगत व्यक्त करतांना ते बोलत होते. व्यासपीठावर प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, संशोधन प्रकल्पाचे अध्यक्ष, प्रसिध्द अर्थतज्ज्ञ तथा अमरावती येथील रायसोनी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. विनायक देशपांडे, वसंतराव नाईक मिशन महाराष्ट्राचे अध्यक्ष ॲड. निलेश हेलोंडे, डॉ. पंजाबराव देशमुख विभागीय अर्थव्यवस्था अध्ययन व नियमन केंद्राचे समन्वयक डॉ. महेंद्र मेटे उपस्थित होते.

डॉ. विनायक देशपांडे म्हणाले, कर्ज किंवा कर्जमाफी ही शेतकरी आत्महत्येवर उपाययोजना होणार नाही. शेतक-यांची कर्ज परतफेडीची क्षमता वाढली पाहिजे. कृषी क्षेत्रात जोडधंदे चालायला पाहिजे. कपाशीची जागा सोयाबीनने घेतली. नॅशनल सॅम्पल सर्व्हेनुसार महाराष्ट्रातील ग्रामीण भाग अन्य राज्यांच्या तुलनेने मागे आहे. शेतमजुरीचा दर वाढला पाहिजे. उत्पन्नातील विषमता संपली पाहिजे. कृषी क्षेत्रात महिलांचे प्रमाण वाढत असल्याचे दिसून येते, मात्र त्या प्रमाणात पुरुषांचे प्रमाण कमी असल्याचे ते म्हणाले.

विद्यापीठ गीताने चर्चासत्राची सुरुवात झाली. प्रास्ताविकेमधून चर्चासत्राच्या आयोजनामागील भूमिका डॉ. पंजाबराव देशमुख अर्थनियमन केंद्राचे समन्वयक तथा संशोधन प्रकल्पाचे सचिव डॉ. महेंद्र मेटे यांनी मांडली. संचालन डॉ. प्रशांत हरमकर यांनी केले. यावेळी व्य.प. सदस्य डॉ व्ही.एम. मेटकर तसेच अमरावती विभागातील शेतकरी चळवळीतील तज्ज्ञ मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



व्यासपीठावर उपस्थित कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते व मान्यवर



चर्चासत्राला उपस्थित शेतकरी चळवळीतील तज्ज्ञ मंडळी

## विद्यार्थी हिताच्या योजनांचा विद्यार्थ्यांनी लाभ घेण्याचे विद्यापीठाचे आवाहन

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाव्दारे राबविण्यात येणा-या विद्यार्थी हिताच्या योजनांचे फलक सर्व महाविद्यालयांनी आपापल्या महाविद्यालयांमध्ये दर्शनी भागात लावावे, जेणेकरुन विद्यार्थ्यांना त्या त्या योजनांचा लाभ घेता येईल, असे आवाहन विद्यापीठाच्यावतीने करण्यात आले आहे.

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्यावतीने विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने केवळ पुस्तकी ज्ञानावर अवलंबून न राहता श्रमसंस्कार, सामाजिक बांधिलकी, आर्थिक सहाय्य याकरिता योजना तयार करण्यात आल्या आहेत. संत गाडगे बाबा कमवा व शिका योजना, संत गाडगे बाबा शुध्द पेयजल योजना, संत गाडगे बाबा विद्याधन योजना, विद्यापीठ विद्यार्थी दायित्व निधी योजना/महाविद्यालय विद्यार्थी दायित्व निधी योजना, संत गाडगे बाबा शिक्षण संरक्षण योजना, संत गाडगे बाबा विद्यार्थीनी बस पास सवलत योजना, संत गाडगे बाबा विद्यार्थी विकास निधी शिष्यवृत्ती, स्व. प्रा. रामप्रकाश शामलालजी राठी स्मृती शिष्यवृत्ती, कौशल्य विकास योजना, संत गाडगे बाबा सायकल योजना, विद्यार्थी सुरक्षा विमा, विविध पुरस्कार यांचा यात समावेश आहे.

विद्यार्थी हितार्थ असलेल्या या योजनांचे फलक सर्व महाविद्यालयांना आपापल्या महाविद्यालयांमध्ये दर्शनी भागात लावावयाचे आहे. फलकांबाबतचा तपशील सर्व महाविद्यालयांना विद्यापीठाच्या विकास विभागामार्फत पाठविण्यात आला असून त्यानुसार महाविद्यालयांनी फलक तयार करुन ते लावावयाचे आहे. सविस्तर माहितीकरिता https://sgbau.ac.in/ या संकेतस्थळावर माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली असून विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. राजीव बोरकर यांचेशी सुध्दा संपर्क साधता येईल, असे विद्यापीठाच्यावतीने आवाहन करण्यात येत आहे.

# सौर ऊर्जा व ऊर्जा संवर्धन क्षेत्रात विद्यापीठाचे दिशादर्शक कार्य - कुलगुरू

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाने सोलर एनर्जी कॉर्पोरेशन ऑफ इंडिया, नवी दिल्ली या केंद्र शासनाच्या संस्थेमार्फत वर्ष २०१८ मध्ये ५७६ किलो वॅट क्षमतेचा सौर ऊर्जा प्रकल्प स्थापन केलेला असून सौर उर्जा व उर्जा संवर्धन क्षेत्रात विद्यापीठाचे कार्य दिशादर्शक असल्याचे मत कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी केले. विद्यापीठाच्या एकूण वीज वापराच्या ५५ ते ६० टक्के वीज ही या प्रकल्पातून निर्मित होत असून ३.६२ रूपये प्रति युनिट वीज दर विद्यापीठासाठी निश्चित केला आहे. वीज वितरण कंपनीचा दर ११.५२ रूपये प्रति युनिट असून सौर प्रकल्पातून निर्मित होणारी वीज अतिशय स्वस्त दरात विद्यापीठाला मिळत आहे. मागील सहा वर्षात जवळपास तीन कोटी रुपयांची मोठी आर्थिक बचत झालेली आहे. याशिवाय निसर्ग संवर्धनासाठी सुद्धा विद्यापीठाने हातभार लावलेला असून सौर ऊर्जा प्रकल्पामुळे ४०८१ टन एवढ्या कार्बन-डाय-ऑक्साइडचे उत्सर्जन नियंत्रित झाले आहे.

### वीज बचतीचे यंत्र व उपकरणांचा वापर

मागील सहा वर्षात वीज बचत करणारे बीएलडीसी सिलिंग पंखे, एलईडी ट्यूबलाइट आणि पथदिवे, पंचतारांकित यंत्रे व उपकरणे यांचा वापर विद्यापीठाने वाढविलेला असून त्यामुळे मोठ्या प्रमाणात वीज बचत झाली आहे. विद्यापीठाचा एकुण वीज वापर १४.६४ लक्ष युनिट वरुन २०२४-२५ मध्ये तो १३. ५७ लक्ष युनिट झाला आहे. मागील सहा वर्षात इमारतींच्या, यंत्रे व उपकरणांच्या तसेच सभा व कार्यक्रमांच्या संख्येत मोठ्या प्रमाणात वाढ झालेली असतांना सुध्दा विद्यापीठाची वीज वापरात झालेली घट उल्लेखनीय आहे.

विद्यापीठातील एकूण लाईट पैकी ८१ टक्के एलईडी लाईट असून ५० टक्के बीएलडीसी सिलिंग पंखे बसविण्यात आलेले आहे. शंभर टक्के उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी निधी मिळण्याकरिता वित्तीय संस्थांकडे विद्यापीठाने प्रस्ताव सादर केला असून सी.एस.आर. फंडासाठी प्रयत्न सुरू आहेत. विद्यापीठाला महाऊर्जाकडून वीज बचत करणारे एलईडी लाईट, बीएलडीसी सिलींग पंखे, पंचतारांकित वातानुकूलन यंत्रे लावण्यासाठी आतापर्यंत दोन टप्प्यांत ४४ लाख रुपयांचे वित्तीय साहाय्य प्राप्त झालेले आहे. सौर ऊर्जेचा वापर जास्तीत जास्त करण्याच्या दृष्टीने सातत्याने प्रयत्नशील असून विद्यापीठ परिसरातील निवासी इमारतींवर जवळपास २०००० लीटर क्षमतेचे सौर बंब बसविण्यात आलेले आहे. ऊर्जा अंकेक्षणाच्या अभ्यासात्मक अहवालानुसार सौर ऊर्जा प्रकल्पाची क्षमता वाढविणे, ऊर्जा बचत तसेच ऊर्जा संवर्धन क्षेत्रात अधिक प्रभावीपणे कार्य करण्याचा विद्यापीठाचा मानस आहे.

### वीज बचत करा - कुलगुरू

वीज बचत करण्यासाठी आणि विजेचा गैरवापर टाळण्यासाठी कुलगुरू डॉ.मिलींद बारहाते यांनी विभागांतर्गत सर्वांना आवाहन केले आहे. विद्यापीठाचा सौर ऊर्जा प्रकल्प आणि विद्युत उपकेंद्र हे आदर्श प्रकल्प असून या ठिकाणी वीज वितरण कंपनीचे प्रशिक्षणार्थी अभियंता यांची चमू तसेच इतर विद्यापीठातील मंडळी आणि इतर मान्यवर नेहमीच भेट देऊन या प्रकल्पाची माहिती जाणून घेतात व विद्यापीठाच्या कार्याची प्रशंसा करतात.

विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांच्या नेतृत्वाखाली आणि प्र-कुलगुरु डॉ.महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, विविध प्राधिकारिणीच्या मार्गदर्शनाखाली विद्यापीठाचे कार्यकारी अभियंता श्री शशिकांत रोडे, विद्युत कक्षाचे उपअभियंता श्री राजेश एडले, कनिष्ठ अभियंता आकाश सोळंके व अभियांत्रिकी विभागातील सर्वच कर्मचा-यांचे प्रयत्न फलदायी ठरले आहेत.



विद्यापीठामधील इमारतींवर कार्यरत सौर उर्जा सयंत्रे

# विद्यापीठामधील विविध इमारतींवर कार्यरत सौरउर्जा सयंत्रे











# कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी विद्यापीठातील सर्व कर्मचाऱ्यांशी साधला संवाद
## विद्यापीठाच्या इतिहासात पहिल्यांदाच संवाद सभा


कर्मचाऱ्यांशी संवाद साधतांना कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते सोबत प्र–कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाची धुरा ज्यांच्या यशस्वी नेतृत्वाखाली गतिमान आहे आणि त्यांनी अल्प कर्मचारी संख्या असूनही कर्मचाऱ्यांमध्ये संस्थेविषयी आपुलकी निर्माण करून विद्यापीठाची प्रशासकीय यंत्रणा इतर विद्यापीठांच्या तुलनेत अधिक गतिशील करून दाखविली असे कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी नुकताच विद्यापीठाच्या दृकश्राव्य सभागृहात विद्यापीठ कर्मचाऱ्यांशी विशेष संवाद साधला. याप्रसंगी व्यासपीठावर प्र–कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे उपस्थित होते. विद्यापीठाच्या इतिहासात पहिल्यांदाच अशी कुलगुरू आणि कर्मचाऱ्यांमध्ये संवाद सभा संपन्न झाली.

संवाद सभेचा मुख्य उद्देश कुलगुरू आणि कर्मचारी यांच्यातील संवाद वाढवणे, कर्मचाऱ्यांच्या अडीअडचणी समजून घेणे आणि विद्यापीठाच्या प्रगतीसाठी एकत्रितपणे काम करण्याच्या संधींवर चर्चा करणे होता. याप्रसंगी कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी नवीन शैक्षणिक धोरण विद्यापीठाने लागू केले आहे, त्यामुळे ते समजून घेऊन त्याची परिपूर्ण अंमलबजावणी करण्यासाठी सर्वांनी परिश्रम घेण्याची गरज आहे. याप्रसंगी त्यांनी विद्यापीठाची सद्यस्थिती व आगामी योजनांबद्दल तसेच शैक्षणिक आणि प्रशासकीय उदिष्टांबद्दल विस्तृत माहिती दिली.

विद्यापीठाला ४२ वर्ष पूर्ण झाली आहेत. या विद्यापीठाचे वटवृक्षात रूपांतर करण्यासाठी येथील कर्मचाऱ्यांनी आजवर अथक परिश्रम घेऊन विद्यापीठाचा नावलौकिक जागतिक स्तरावर पोहोचविण्यासाठी बहुमूल्य योगदान दिले आहे, याबद्दल कुलगुरूंनी सर्वांचे कौतुक करून सर्व कर्मचाऱ्यांनी विद्यापीठाच्या विकासात आणखी सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन केले.

कर्मचाऱ्यांनीही आपली मते, सूचना आणि काही समस्या कुलगुरूंसमोर मांडल्या. कुलगुरूंनी कर्मचाऱ्यांच्या प्रत्येक मुद्दे गांभीर्याने ऐकून घेतले आणि त्यावर योग्य विचार करून सकारात्मक तोडगा काढण्याचे आश्वासन दिले. कर्मचाऱ्यांच्या प्रश्नांना त्यांनी थेट उत्तरे दिलीत आणि त्यांच्या शंकांचे निरसन केले.

या संवाद सभेमुळे कुलगुरू आणि कर्मचारी यांच्यातील संबंध अधिक दृढ होण्यास मदत झाली. दोन्ही बाजूंनी एकमेकांच्या भूमिका समजून घेण्यास आणि भविष्यात अधिक चांगल्या प्रकारे समन्वय साधण्यास या संवाद सभेमुळे व्यासपीठ मिळाल्याची भावना कर्मचाऱ्यांनी मांडून आनंद व्यक्त केला. संवाद सभेचे संचालन कुलगुरूंचे स्वीय सहाय्यक श्री रमेश जाधव यांनी केले. यावेळी वर्ग २ ते ४ पर्यंतचे सर्व कर्मचारी सभेला मोठ्या संख्येने उपस्थित होते.





सभागृहामध्ये उपस्थित विविध विभागामधील अधिकारी व कर्मचारी

# स्तनदा माता विद्यार्थीनींसाठी अमरावती विद्यापीठाचा महत्त्वपूर्ण निर्णय


संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाने नुकताच एक महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. या निर्णयानुसार विद्यापीठाच्या परीक्षांमध्ये स्तनदा माता विद्यार्थीनींना विशेष सुविधा मिळणार आहेत. विद्यापीठाने ७ मे, २०२५ रोजी याबाबतची अधिसूचना जारी केली आहे.

सदर अधिसूचनेनुसार, ज्या माता आपल्या बाळांना स्तनपान करतात, अशा विद्यार्थीनींना परीक्षेदरम्यान काही प्रमाणात अतिरिक्त वेळ आणि आवश्यक सुविधा पुरविल्या जाणार आहेत. नियमानुसार, परीक्षा सुरू झाल्यानंतर एक तासाने इतर विद्यार्थ्यांना ज्याप्रमाणे खोली सोडण्याची परवानगी दिल्या जाते, त्याचप्रमाणे स्तनदा मातांना त्यांच्या बाळाला स्तनपान करण्यासाठी खोली सोडता येणार आहे. यासाठी त्यांना प्रश्नपत्रिका सोडवण्यासाठी वीस मिनिटांचा अतिरिक्त वेळ दिला जाईल. उदाहरणार्थ, जर परीक्षा तीन तासांची असेल, तर स्तनदा मातांना तीन तास आणि वीस मिनिटे मिळतील.

बाळाची काळजी घेण्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित विद्यार्थीनीच्या कुटुंबियांची राहील. स्तनपान करण्यासाठी परीक्षा केंद्रावर उपलब्ध असलेल्या स्वतंत्र कक्षात (हिरकणी कक्ष) केवळ स्तनदा मातांनाच प्रवेश दिला जाईल. बाळासाठी आवश्यक असलेल्या साहित्याव्यतिरिक्त इतर कोणतीही आक्षेपार्ह वस्तू कक्षात आणण्यास मनाई असेल. बाळाला स्तनपान करून परतल्यानंतर, महिला पर्यवेक्षक/परीक्षा प्रमुख/सह–परीक्षा प्रमुख हे त्यांची तपासणी करतील, त्यानंतरच त्यांना परीक्षा हॉलमध्ये प्रवेश दिला जाईल. सर्व स्तनदा मातांना त्यांच्या प्रवेशपत्रिकेवरील आणि उत्तरपत्रिकेवरील सूचनांचे काटेकोरपणे पालन करणे अनिवार्य असेल. ही सुविधा केवळ ज्यांच्या बाळांचे वय सहा महिन्यांपेक्षा कमी आहे अशाच स्तनदा माता विद्यार्थीनींना या सुविधा उपलब्ध करुन दिल्या जातील, मात्र सुविधेचा लाभ घेण्यासाठी मातांना बाळाचे जन्म प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक असेल.

सदर निर्णयामुळे स्तनदा माता विद्यार्थीनींना मोठा दिलासा मिळाला आहे. शिक्षण आणि मातृत्व या दोन्ही जबाबदा–या समर्थपणे पार पाडण्यासाठी सदर निर्णय सहाय्यक ठरेल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी घेतलेल्या या निर्णयामुळे स्तनदा माता विद्यार्थीनींमध्ये आनंद पसरला असल्याच्या भावना परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. नितीन कोळी यांनी व्यक्त केल्या.

# आजीवन अध्ययन विभागात 'स्किझोफ्रेनिया : समज–अपसमज' विषयावर व्याख्यान संपन्न




संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील आजीवन अध्ययन व विस्तार विभाग आणि मानस प्रबोधनी, अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने 'स्किझोफ्रेनिया : समज–अपसमज' या विषयावर नुकतेच अतिथी व्याख्यान संपन्न झाले. अमरावती शहरातील मानस हॉस्पिटलचे मानसशास्त्रज्ञ व समुपदेशक डॉ. पंकज वसाडकर यांचे विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन लाभले.

आज आपण विज्ञान, तंत्रज्ञान, आणि वैद्यकीय प्रगतीच्या अनेक टप्प्यांवर पोहोचलो आहोत. पण मानसिक आरोग्याविषयी आपल्या समाजात अजूनही अज्ञान, भीती आणि गैरसमज आहे. स्किझोफ्रेनिया हा याच अज्ञानाचा बळी ठरलेला आजार आहे. हा आजार म्हणजे व्यक्तीच्या विचार प्रक्रियेचा, वास्तव जाणिवेचा आणि सामाजिक वागणुकीचा विस्कळीतपणा होय, मात्र समाजात त्याला कलंक लावला जातो, त्यामुळे अशा रुग्णांसाठी तो अधिक त्रासदायक ठरतो.

रोग बरा होत नाही, धोकादायक आहे, अशा प्रकारच्या प्रवृत्तीमुळे अनेक रुग्णांना मोठा मनस्ताप सहन करावा लागतो. स्किझोफ्रेनियाच्या रुग्णांकडे वेगळ्या नजरेने पाहिले जाते. परिणामी रुग्ण लपवले जातात व योग्य ते उपचार त्यांना मिळत नाहीत.

अध्यक्षीय भाषणात विभागाचे संचालक डॉ. श्रीकांत पाटील यांनी स्किझोफ्रेनिया म्हणजे तुटलेली ओळख नव्हे, ती नव्याने जोडण्याची संधी आहे. आपण त्यांचा आरसा होऊ. समाजातील प्रत्येकाने मानसिक रुग्णांकडे सहानुभूतीने पाहण्याची गरज आहे. कलंक, टीका किंवा उपेक्षा करू नये. त्याऐवजी समजूतदारपणाचं वातावरण निर्माण करावे आणि अशा रुग्णांना आधार द्यावा, असे आवाहन केले. व्याख्यानाच्या माध्यमातून विद्यार्थी तसेच समुपदेशक यांना आजाराची लक्षणे, कारणे, उपचारपध्दती व समज–अपसमज यांची सखोल माहिती देण्यात आली. सूत्रसंचालन प्रा. स्नेहल वानखडे, तर आभार प्रा. जुबेर खान यांनी मानले. व्याख्यान कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा. मंजुषा बारबुध्दे, प्रा. शिवाणी अग्रवाल, प्रा. अर्चना ढोरे, प्रा. सुरेश राहेटे, प्रा. प्रियंका तायडे यांनी परीश्रम घेतले.

## आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे अभ्यासक्रम समाजासाठी प्रेरक - आयुक्त रविंद्र ठाकरे



आयुक्त श्री रविंद्र ठाकरे यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करतांना विभागाचे संचालक डॉ. श्रीकांत पाटील

समाजातील ज्वलंत प्रश्न, समस्यां आणि अडचणी लक्षात घेता त्यावर परिणामकारक असे विद्यार्थांना शिक्षण मिळणे महत्वाचे आहे. विद्यार्थांच्या कौशल्य विकासाबरोबरच सामाजिक बांधीलकी जोपासणे आजच्या काळची गरज असून या गरजेची पूर्तता विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन व विस्तार विभागाद्वारे सातत्याने होत असल्याचे दिसून येते. या विभागातील अभ्यासक्रम समाजासाठी प्रेरक असल्याचे मत अमरावती येथील राज्य माहिती आयुक्त श्री रविंद्र ठाकरे यांनी मांडले. अमरावती येथील राज्य माहिती आयोगाचे आयुक्त म्हणून श्री ठाकरे यांची नियुक्ती झाल्यामुळे स्वागतपर चर्चा करतांना ते बोलत होते. यावेळी विद्यापीठाच्या डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख अर्थनियमन केंद्राचे समन्वयक डॉ. महेंद्र मेटे, डॉ. भगवान फाडके आदी उपस्थित होते.

श्री रविंद्र ठाकरे पुढे म्हणाले, विद्यापीठामध्ये सुरू असलेल्या आजीवन अध्ययन व विस्तार विभागातील पदव्युत्तर अभ्यासक्रमाचे कौतुक करून अशा अभ्यासक्रमांची ज्येष्ठ नागरिकांना तसेच विद्यार्थांना आपल्या शिक्षणाची भूक भागविण्यासाठी हा विभाग अत्यंत गरजेचा आहे. माहिती अधिकाराविषयी समाजात जनजागृती करण्यासाठी राज्य माहिती आयोग कार्यालय आणि विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने चांगली भूमिका पार पाडू शकते, असेही ते यावेळी म्हणाले.

प्रशासकीय सेवेमध्ये अनेक अधिकारी, कर्मचारी काम करतात परंतु प्रत्येक अधिकाऱ्याची काम करण्याची पद्धत आणि शैली ही वेगवेगळी असते. आपल्या कार्यप्रतिभेमुळे प्रत्येक नागरिकांना योग्य न्याय मिळावा व आपली सेवा ही जनसेवा असावी अशा लोककल्याणकारी विचाराने पाईक असलेले अधिकारी फारच नगण्य असलेले दिसून येतात. या नगण्य असलेल्या यादीमध्ये समावेश असलेले एक कर्तव्यदक्ष अधिकारी म्हणून मा.श्री.रविंद्र ठाकरे यांचे नाव अग्रक्रमाने घेतल्या जाते. भारतीय प्रशासकीय सेवेत जिल्हाधिकारी, अतिरिक्त विभागीय आयुक्त, महापालिका आयुक्त अशा उच्च पदावर कार्य करणारे श्री रविंद्र ठाकरे यांची नुकतीच राज्य माहिती आयोग, मुंबई यांनी राज्य माहिती आयुक्त म्हणून नियुक्ती केली व अमरावतीला राज्य माहिती आयुक्त म्हणून ते रुजू झाले. अमरावती सारख्या समृद्ध शहराला एक प्रामाणिक आणि निष्ठेने कार्य करणारा अधिकारी मिळणं, ही खरोखर गौरवाची बाब असून त्यांच्या निवडीबद्दल संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे संचालक डॉ. श्रीकांत पाटील यांनी त्यांचा यथोचित सन्मान केला. श्री रविंद्र ठाकरे यांच्याशी चर्चा करतांना आजीवन अध्ययन व विस्तार विभागामध्ये सुरु असलेल्या अभ्यासक्रमाची माहिती देत समाजासाठी या अभ्यासक्रमाचे अनन्यसाधारण महत्व असल्याचे डॉ. श्रीकांत पाटील यांनी सांगितले. समाजातील प्रत्येक नागरिक हा आपले हक्क व अधिकाराविषयी जागृत असला पाहिजे, यामुळे समाज आणखी पारदर्शक बनेल. राज्य माहिती आयोगाद्वारे समाजाला एक दिशा मिळण्यास मदत होत असल्याचे डॉ. पाटील म्हणाले.

# पुस्तके माणसांचे मन समृध्द करतात - डॉ. वैभव मस्के



व्याख्यान देतांना डॉ. वैभव मस्के

पुस्तके माणसाचे मन समृध्द करतात, वैचारिक क्षमता वाढविण्यास मदत करतात, विद्यार्थ्यांच्या आयुष्याला योग्य ती दिशा दाखवितात, असे प्रतिपादन एम. ए. छत्रपती शिवाजी महाराज विचार व व्यवस्थापन अभ्यासक्रमाचे प्रा. डॉ. वैभव मस्के यांनी केले. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील आजीवन अध्ययन व विस्तार विभागाच्या पी.जी डिप्लोमा कम्युनिकेशन स्किल्स इन इंग्लिश या अभ्यासक्रमाच्यावतीने जागतिक पुस्तक दिनानिमित्त अतिथी व्याख्यान देतांना ते बोलत होते. विचारपीठावर अध्यक्षस्थानी विभागाचे संचालक डॉ. श्रीकांत पाटील होते.

डॉ. मस्के पुढे म्हणाले, अवांतर वाचनाने माणसाची मने समृध्द होतात; पण माणूस हजरजबाबी सुध्दा बनतो. क्रिकेटपटू सुनील गावस्कर यांचे उदाहरण देताना ते म्हणाले, पुस्तके माणसाला अज्ञानाच्या अंधारातून ज्ञानाच्या उजेडात येण्यास मदत करतात. आपल्याला वाचनासाठी वेळ नसतो, पण मनशांतीसाठी वाचन आवश्यक, असेही ते म्हणाले.

तंत्रज्ञान, सोशल मीडियामुळे आधुनिक जीवनात वाचन संस्कृती लोप पावत आहे, पण विद्यार्थ्यांनी ग्रंथालयाच्या सावलीत जावून भरपूर वाचन करावे असा मोलाचा सल्ला डॉ. श्रीकांत पाटील यांनी विद्यार्थ्यांना दिला. सूत्रसंचालन आदित्य आठवले, तर आभार पल्लवी पाटील यांनी मानले. व्याख्यान कार्यक्रमाला प्राध्यापकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते.

## जयंती विशेष

# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठात छत्रपती संभाजी महाराज जयंती साजरी

स्वराज्य रक्षक छत्रपती संभाजी महाराज यांची जयंती संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठात साजरी करण्यात आली. यावेळी कुलसचिव डॉ. अविनाश असनारे यांनी छत्रपती संभाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन, हारार्पण करुन विद्यापीठाच्यावतीने अभिवादन केले. जयंती कार्यक्रमाला नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळाचे संचालक डॉ. अजय लाड, उपकुलसचिव (आस्थापना) श्री मंगेश वरखेडे तसेच विद्यापीठातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. संचालन व छत्रपती संभाजी महाराज यांच्याबद्दल भांडार विभागातील अधीक्षक श्री धनंजय पाटील यांनी माहिती दिली.



छत्रपती संभाजी महाराज यांना अभिवादन करतांना कुलसचिव डॉ. अविनाश असनारे व इतर

# विद्यापीठात माजी पंतप्रधान भारतरत्न राजीव गांधी यांची पुण्यतिथी संपन्न
## दहशतवाद व हिंसाचार विरोधी दिनानिमित्त कुलगुरुंनी दिली प्रतिज्ञा



संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठात भारताचे माजी पंतप्रधान भारतरत्न राजीव गांधी यांची पुण्यतिथी दहशतवाद व हिंसाचार विरोधी दिन म्हणून संपन्न झाली. याप्रसंगी कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी राजीव गांधी यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पार्पण करुन विद्यापीठाच्यावतीने अभिवादन केले व उपस्थितांना दहशतवाद व हिंसाचार विरोधी दिनानिमित्त प्रतिज्ञा दिली. याप्रसंगी प्र–कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे संचालक डॉ. श्रीकांत पाटील, विद्यापीठातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. संचालन व माजी पंतप्रधान भारतरत्न राजीव गांधी यांच्याबद्दल जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर यांनी माहिती दिली.




दहशतवाद व हिंसाचार विरोधी दिनानिमित्त उपस्थितांना शपथ देतांना कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते व इतर उपस्थित

# भारताला युध्दाची नाही, तर बुध्दाची गरज - डॉ. संतोष बनसोड
## विद्यापीठातील बुध्दिस्ट स्टडीज सेंटर येथे बुध्द जयंती साजरी




बुध्द जयंती कार्यक्रमाला उपस्थित मान्यवर

आज भारताला युध्दाची नाही, तर बुध्दाची गरज आहे, असे प्रतिपादन विद्यापीठ अधिसभा सदस्य डॉ. संतोष बनसोड यांनी केले. संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठातील बुध्दिस्ट स्टडीज सेंटर येथे आयोजित बुध्द जयंती प्रसंगी ते बोलत होते. यावेळी भगवान गौतम बुध्दांच्या प्रतिमेचे पूजन, मेणबत्ती प्रज्वलन करुन बुध्द वंदना घेण्यात आली.

डॉ. संतोष बनसोड म्हणाले, भारतामध्ये तथागत भगवान गौतम बुद्धाने प्रेमाचा संदेश आणि अहिंसेचा विचार आजपासून २५०० वर्षांपूर्वी दिला. या विचाराची आज भारताला गरज आहे. म्हणून भारताला युध्द नको, तर बुध्द पाहिजे.

जयंती कार्यक्रमाला डॉ. रत्नशिल खोब्रागडे, डॉ. प्रेमानंद तिडके, डॉ. अनिल नाईक, डॉ. कपिल कांबळे, प्रा. रामचंद्र वरघट, भीमराव वाठोरे, प्रभाकर भाले आदी उपस्थित होते. प्रास्ताविक बुध्दिस्ट स्टडीज सेंटरचे समन्वयक प्रा. नागले, संचालन मैत्रेय खोब्रागडे, तर आभार कामिनी गुडधे यांनी मानले.

# विद्यापीठात
# स्वातंत्र्यवीर सावरकर यांची जयंती साजरी



हारार्पण करतांना कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठात स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांची जयंती साजरी करण्यात आली. कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पार्पण करुन विद्यापीठाच्यावतीने अभिवादन केले. यावेळी प्र–कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, व्यवस्थापन परिषद सदस्य प्राचार्य डॉ. आर.डी. सिकची, प्राचार्य डॉ. व्ही.एच. नागरे, प्राचार्य डॉ. हेमंत देशमुख, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. नितीन कोळी, ननसा संचालक डॉ. अजय लाड, सहा. कुलसचिव डॉ. साक्षी ठाकुर तसेच विद्यापीठातील अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते. संचालन व स्वातंत्रवीर विनायक दामोदर सावरकर यांच्याबद्दल माहिती जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर यांनी दिली.



जयंती कार्यक्रमाला उपस्थित मान्यवर



विद्यापीठातील निसर्गरम्य जलाशयाचे दृश्य

# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठात डॉ. शिवाजीराव उपाख्य दाजीसाहेब पटवर्धन यांची पुण्यतिथी संपन्न



संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठात डॉ. शिवाजीराव उपाख्य दाजीसाहेब पटवर्धन यांची पुण्यतिथी डॉ. शिवाजीराव उपाख्य दाजीसाहेब पटवर्धन वसतीगृह येथे संपन्न झाली. कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी डॉ. शिवाजीराव उपाख्य दाजीसाहेब पटवर्धन यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पार्पण करुन विद्यापीठाच्यावतीने अभिवादन केले. यावेळी प्र–कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, वार्डन डॉ. जागृती बारब्दे तसेच वसतीगृहातील श्री चंद्रशेखर लोखंडे, कर्मचारी, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. संचालन व डॉ. शिवाजीराव उपाख्य दाजीसाहेब पटवर्धन यांच्याबद्दल माहिती जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर यांनी दिली.



**डॉ. शिवाजीराव उपाख्य दाजीसाहेब पटवर्धन यांच्या प्रतिमेला पुष्पार्पण करून अभिवादन करतांना कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते**

# विद्यापीठात कार्यरत सुधाकर इंगळे यांना विद्यापीठाच्यावतीने सामुहिक श्रद्धांजली

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील कुलगुरू निवासस्थान येथे कार्यरत सुधाकर जनार्दन इंगळे यांचे १७ मे रोजी दु:खद निधन झाले. त्यांच्या निधनाप्रसंगी कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांचे अध्यक्षतेखाली विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीजवळ शोकसभा संपन्न झाली. याप्रसंगी प्र–कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे तसेच विद्यापीठाचे प्रशासकीय व शैक्षणिक विभागप्रमुख, शिक्षक, अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

शोकसंवेदना व्यक्त करतांना कुलगुरू म्हणाले, कामाप्रती प्रामाणिक, मनमिळावू आणि सर्वांशी सौजन्याचे संबंध असलेले सुधाकर इंगळे यांच्या दु:खद निधनाने त्यांच्या कुटुंबाची फार मोठी हानी झाली आहे. सुधाकर इंगळे यांच्या दु:खद निधनाने त्यांच्या कुटुंबियांवर जो दु:खाचा डोंगर कोसळला, ते दु:ख सहन करण्याची शक्ती ईश्वर त्यांना देवो, अशी प्रार्थना करून स्व. सुधाकर जनार्दन इंगळे यांना विद्यापीठातर्फे विनम्र श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. याप्रसंगी सर्वांनी दोन मिनिटे मौन पाळले.

मातृभूमि

# विद्यापीठाची सर्वच क्षेत्रात लक्षणीय कामगिरी

## * कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांचे प्रतिपादन * विद्यापीठात कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांचे हस्ते ध्वजारोहण







**प्रतिनिधी /२ मे**

**अमरावती :** शिक्षण, कला, क्रीडा, साहित्य, संशोधन अशा सर्वच क्षेत्रात संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाने लक्षणिय कामगिरी केली आहे, विद्यार्थ्यांकरिता नवनवीन शैक्षणिक व प्रशासकीय इमारती डौलदारपणे उभ्या रहात आहेत, त्यामुळे विद्यार्थ्यांना वेगळाच असा आनंद मिळतो, असे प्रतिपादन विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. मिलींद बारहाते यांनी केले.

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचा स्थापना दिन, महाराष्ट्र दिन आणि आंतरराष्ट्रीय कामगार दिनाचे औचित्य साधून विद्यापीठामध्ये १ मे रोजी कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांचे शुभहस्ते ध्वजारोहण करण्यात आले, त्याप्रसंगी मार्गदर्शन करतांना ते बोलत होते. ध्वजस्तंभाजवळ प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, विद्यार्थी विकास संचालक डॉ. राजीव बोरकर, श्री राजेश पिदडी, तर प्रांगणात सर्व प्रशासकीय व शैक्षणिक विभागप्रमुख, शिक्षक, अधिकारी, कर्मचारी व विद्यार्थी मोठए संख्येने उपस्थित होते. संचालन शारीरिक शिक्षण व क्रीडा संचालक डॉ. तनुजा राऊत यांनी केले. कुलगुरू पुढे म्हणाले, विद्यापीठ स्थापनेला ४२ वर्षे पूर्ण झाली आहेत. एका लहानशा रोपटएाचे आता वटवृक्षात रुपांतर होत आहे. विद्यापीठाने शिक्षण, संशोधन, कला, साहित्य, क्रीडा क्षेत्रात लक्षणीय कामगिरी केलेली आहे. पर्यावरण व ऊर्जा संवर्धनासाठी विद्यापीठाला मानांकित पुरस्काराने गौरविण्यात आले आहे विविध समारंभ, क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धा यासाठी प्रशस्त अशा बहुउद्देशीय सभागृह आणि आंतरगृह क्रीडा इमारतीचे नुकतेच मुख्यमंत्री ना.श्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या हस्ते भूमिपूजन झाले. त्यामुळे मोठी सुविधा होणार आहे. ते म्हणाले, आदिवासी मुलींचे वसतीगृह इमारत व रासायनिक तंत्रशास्त्र विभाग विस्तारित इमारतीचे लोकार्पणही महामहीम राज्यपालांच्या हस्ते झाले. त्यामुळे विद्यार्थ्यांना आणखी सुविधा मिळाल्या आहेत. अमरावती जिल्हाला प्रथम महिला राष्ट्रपती आणि मा. सर्वोच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधिशाचा मोठा मान मिळाला आहे ही अतिशय अभिमानाची आणि गौरवाची बाब आहे. विद्यापीठात आदिवासी अध्यासन केंद्र देखील लवकरच सुरू केले जाणार आहे. यामुळे आदिवासी समुदायांच्या शैक्षणिक गरजा तसेच त्यांना उच्च शिक्षणाच्या संधी आणि स्वतंत्र सुविधा मिळण्यास मदत होईल. विद्यापीठाला रू. ३ लक्ष चा सी.एस.आर. फंड घरकुल इंडस्ट्रिजकडून मिळाला, अशाच प्रकारे जास्तीतजास्त सी.एस.आर. फंड विद्यापीठाला प्राप्त व्हावा, याकरीता सर्वांनी प्रयत्न करावे असेही ते म्हणाले. विद्यापीठात दिव्यांगांसाठी बॅटरीवर चालणाया ट्रायसिकलची सुविधा उपलब्ध करून दिली आहे, त्यामुळे दिव्यांग विद्यार्थ्यांना मोठी सुविधा मिळाली आहे. विद्यापीठात नानिविध प्रकारचे कार्यक्रम, व्याख्याने, कार्यशाळा, महिला सक्षमीकरणासाठी प्रयत्न, मेळघाटातील आदिवासी बांधवांमध्ये शासनाच्या विविध योजनांबाबत जनजागृती, लोकनाटए महोत्सव, असे कार्यक्रम होतात, त्यामुळे. ज्ञानदानात आणखी भर पडते. एम.बी.ए. विभागाच्या ४२ विद्यार्थ्यांची विविध क्षेत्रातील नामांकित संस्था व कंपन्यांमध्ये निवड झाली आहे. महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे घेतल्या गेलेल्या परीक्षेमधून विद्यापीठ परिक्षेत्रातील विद्यापीठाचे विद्यार्थी आय.ए.एस. व आय.पी.एस. झाले आहेत. विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांनी कला, संशोधन, साहित्य, क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धांमध्ये घवघवीत यश संपादन केले आहे. एकंदरीत, विद्यापीठाची अशा सर्वच क्षेत्रात लक्षणिय कामगिरी झाली आहे, असेही कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते म्हणाले.

प्रतिदिन अखबार

# पुरस्कार मिलने पर बढ़ जाती है जिम्मेदारी

## कुलगुरू बारहाते का प्रतिपादन, विवि में सेवा गौरव पुरस्कार व वार्षिकांक स्पर्धा पुरस्कार का वितरण



**प्रतिनिधि/प्रतिदिन अखबार**

**अमरावती, 2 मई -** विद्यापीठ व महाविद्यालयों के प्राचार्य, शिक्षक, अधिकारी, कर्मचारियों को उत्कृष्ट सेवा लिए पुरस्कार मिला है. यह पुरस्कार मिलने से अब उन्हें एक आदर्श व्यक्ति के रूप देखा जाएगा. पुरस्कार मिलने पर आपकी जिम्मेदारी भी उतनी ही बढ़ गयी है. प्रत्येक प्राचार्य, शिक्षक, अधिकारी व कर्मचारी दीपस्तंभ के समान है, ऐसे उद्गार विद्यापीठ के कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते ने व्यक्त किए.

संगाबा अमरावती विद्यापीठ की ओर से स्थापना दिवस, महाराष्ट्र दिवस व अंतरराष्ट्रीय श्रमिक दिवस प्रित्यर्थ उत्कृष्ट सेवा गौरव पुरस्कार 2024, कल्पना चावला युवा महिला शोधकर्ता पुरस्कार व वार्षिकांक स्पर्धा 2024-25 के पुरस्कार वितरण का आयोजन किया गया. इस अवसर पर वे बोल रहे थे. कुलगुरू डॉ. बारहाते के हाथों पुरस्कार प्रदान किए गए. इस अवसर पर प्र कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. वी.पी. गुडधे मैडम, अधिष्ठाता डॉ. एचआर देशमुख उपस्थित थे. उत्कृष्ट सेवा गौरव पुरस्कार के अंतर्गत शॉल, श्रीफल, गौरव प्रमाणपत्र व रजत पदक प्रदान करके कुलगुरू डॉ. बारहाते ने विद्यापीठ से संलग्नित महाविद्यालय के सर्वसाधारण वर्गनिहाय प्राचार्यों में से उत्कृष्ट शैक्षणिक कार्य करने के बदले व उस माध्यम से महाविद्यालय को व पर्यायी रूप से विद्यापीठ को उत्कृष्ट सेवा प्रदान करने के बदले प्राचार्य डॉ. जयंत चतुर, विद्याभारती मवि अमरावती की प्राचार्या डॉ. प्रज्ञा येनकर का, संलग्नित महाविद्यालय की सर्वसाधारण वर्ग निहाय शिक्षकों में उत्कृष्ट सेवा प्रदान करने के बदले महाविद्यालयीन शिक्षक डॉ. दीपक कोचे, महिला आरक्षित श्रेणी निहाय शिक्षकों में से डॉ. पूनम अग्रवाल, विद्यापीठ प्रथम श्रेणी सर्वसाधारण श्रेणी निहाय अधिकारियों में से डॉ. विलास नांदूरकर, विद्यापीठ द्वितीय श्रेणी सर्वसाधारण वर्ग निहाय अधिकारियों में से उमेश लांडगे, विद्यापीठ द्वितीय श्रेणी महिला आरक्षित अधिकारियों में से उमा चांभारे, कर्मचारियों में से प्रवीण अलटकर, तृतीय श्रेणी महिला आरक्षित श्रेणी निहाय कर्मचारियों में से प्रज्ञा बोंडे मैडम, विद्यपीठ से संलग्नित मवि के सभी स्तर के शिक्षकेत्तर सर्वसाधारण श्रेणी निहाय कर्मचारियों में से जयंत निखारे, चतुर्थ श्रेणी सर्वसाधारण कर्मचारियों में से गजानन देशमुख का उसी प्रकार कल्पना चावला युवा महिला शोधकर्ता पुरस्कार प्राप्त डॉ. प्रीती टवलारे का शॉल-श्रीफल व 25 हजार रुपए नगद प्रदान कर सत्कार किया.

वार्षिकांक स्पर्धा में शहरी विभागों के अंतर्गत गैर व्यावसायिक गुट में प्रथम क्रमांक भारतीय मवि, अमरावती की 'भारती' नामक वार्षिकांक को, द्वितीय क्रमांक शिवाजी विज्ञान मवि की 'क्रिएशन' नामक वार्षिकांक को तथा तृतीय क्रमांक अमोलकचंद मवि, यवतमाल की 'शब्दार्क' नामक वार्षिकांक को, ग्रामीण विभाग में गैर व्यावसायिक गुट में प्रथम इंदिरा मवि कलंब की 'कादिंबिनी' वार्षिकांक को, द्वितीय पुरस्कार गोसी टोम्पे मवि चांदूर बाजार के 'फुलोर' वार्षिकांक को तथा तृतीय क्रमांक फूलसिंह नाईक मवि, पुसद की 'कल्पना' नामक वार्षिकांक को प्राप्त हुए. इसके अलावा शहर व ग्रामीण विभागों के अंतर्गत व्यावसायिक गुटों में भी क्रमानुसार तीन पुरस्कार डॉ. मिलिंद बारहाते के हस्ते स्मृतिचिन्ह व गौरव प्रमाणपत्र प्रदान कर संबंधित महाविद्यालयों को सम्मानित किया गया.

सभी पुरस्कार प्राप्त करने वाले व्यक्तियों का कुलगुरू ने अभिनंदन करते हुए उन्हें उज्ज्वल भविष्य के लिए शुभकामाएं दी. कार्यक्रम का शुभारंभ राष्ट्रगीत, महाराष्ट्रगीत व विद्यापीठ गीत से हुआ. पश्चात संत गाड़गेबाबा के तैलचित्र का पूजन व माल्यार्पण मान्यवरों के हस्ते किया गया. संचालन धनंजय पाटिल ने तथा आभार प्रदर्शन पीआरओ विलास नांदूरकर ने किया. कार्यक्रम में विद्यापीठ व्यवस्थापन परिषद के सदस्य व प्रशासकीय विभाग प्रमुख, संलग्नित मवि के प्राचार्य, शिक्षक, अधिकारी, कर्मचारी व विद्यार्थी बड़ी संख्या में उपस्थित थे.

तरुण भारत

# अमरावती विद्यापीठात आदिवासी अध्यासन केंद्र

## लवकरच होणार स्थापन, शासनाचा निर्णय



शिष्टमंडळ कुलगुरूंचे अभिनंदन करताना

◆ **अमरावती, ३० एप्रिल**
अमरावती विद्यापीठात आदिवासी अध्यासन केंद्र स्थापन करण्याचा महाराष्ट्र शासनाने नुकताच निर्णय घेऊन याबाबतचा शासन निर्णय निर्गमित केला आहे. अमरावती विद्यापीठ परिक्षेत्रात आदिवासीबहुल क्षेत्र मोठ्या प्रमाणावर आहे. या परिक्षेत्रातील आदिवासी समुदायांच्या शैक्षणिक गरजा पूर्ण व्हाव्यात, उच्च शिक्षणाच्या संधीचा लाभ मिळावा, आदिवासी विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र सुविधा व त्याद्वारे आदिवासी विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा, याकरिता कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते यांनी विद्यापीठामध्ये आदिवासी अध्यासन केंद्र स्थापन करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाला पाठविला होता. त्यांच्या प्रयत्नांना यश मिळाले असून या केंद्रास शासनाने मंजुरी दिली आहे. त्याबद्दल त्यांचे आदिवासी शिष्टमंडळाने भेटून अभिनंदन केले.

महाराष्ट्र सार्वजनिक अधिनियमात नमूद केलेल्या उद्दिष्टांव्यतिरिक्त मानववंशशास्त्र अभ्यास माडिया, गोंडी, बैगा, कोलम इ. आदिवासी भाषा, संस्कृती व जीवनशैली जतन, आदिवासी ज्ञान, कला, संस्कृती, परंपरा, रीतीरिवाज, उपजीविका अभ्यास आणि आर्थिक सक्षमीकरण जसे, पर्यावरणीय पर्यटन, वन पर्यटन, जलमार्ग व्यवस्थापन, जंगलांशी संबंधित धातूशास्त्र, कापड आणि त्याचे उत्पादन तंत्रज्ञान, औषधी वनस्पतींचा अभ्यास, खनिजशास्त्र, आदिवासी विद्यार्थ्यांचे उच्च व तंत्र शिक्षणातील प्रमाण वाढविण्यासाठी त्यांना दर्जेदार शिक्षणाची व्यवस्था करणे आणि त्याव्दारे त्यांना रोजगारक्षम बनविणे, याकरिता हे अध्यासन केंद्र स्थापन करण्यामागील उद्दिष्टे आहेत. या उद्दिष्टांबाबत अभ्यास व संशोधन या स्थापन होणाऱ्या अध्यासन केंद्रात होणार आहे.

शासनाच्या विविध विभागांकडून राबविल्या जाणाऱ्या आदिवासी विकासासाठीच्या योजना व कार्यक्रमाचे मूल्यमापन, मूल्यांकन तसेच त्यासंबंधी धोरणात्मक शिफारसी करण्याची कार्यवाही संबंधित विभागाला या अध्यासन केंद्रामार्फत करावी लागणार आहे.

या केंद्रासाठी उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे अपर मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली मुंबई, जळगांव, नांदेड, अमरावती, गडचिरोली या विद्यापीठांचे कुलगुरू सदस्य असलेली समन्वय समिती गठित केली असून सदस्य सचिव उच्च व तंत्र शिक्षण संचालक असतील.

◀ *(तभा वृत्तसेवा)*

नवभारत

**समारोह** विवि में सेवा गौरव व वार्षिकांक प्रतियोगिता के पुरस्कार वितरित

# पुरस्कार से बढ़ती है जिम्मेदारी : बारहाते



■ **अमरावती, ब्यूरो.** विद्यापीठ के उपकुलपति डॉ. मिलिंद बारहाते ने कहा कि विश्वविद्यालय व महाविद्यालयों के प्राचार्य, शिक्षक, अधिकारी, कर्मचारियों को उत्कृष्ट सेवा लिए पुरस्कार मिला है. यह पुरस्कार मिलने से अब उन्हें एक आदर्श व्यक्ति के रूप देखा जाएगा. पुरस्कार मिलने पर आपकी जिम्मेदारी भी उतनी ही बढ़ गयी है. प्रत्येक प्राचार्य, शिक्षक, अधिकारी व कर्मचारी दीपस्तंभ के समान है. संगावा अमरावती विद्यापीठ की ओर से स्थापना दिवस, महाराष्ट्र दिवस व अंतरराष्ट्रीय श्रमिक दिवस प्रित्यर्थ उत्कृष्ट सेवा गौरव पुरस्कार 2024, कल्पना चावला युवा महिला शोधकर्ता पुरस्कार व वार्षिकांक स्पर्धा 2024-25 के पुरस्कार वितरण का आयोजन किया गया. इस अवसर पर डॉ. बारहाते के हाथों पुरस्कार प्रदान किए गए. इस अवसर पर प्र कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. वी.पी. गुडधे, अधिष्ठाता डॉ. एचआर देशमुख उपस्थित थे. उत्कृष्ट शैक्षणिक कार्य करने वाले प्राचार्य डॉ. जयंत चतुर, प्राचार्या डॉ. प्रज्ञा येनकर, डॉ. दीपक कोचे, डॉ. पूनम अग्रवाल, डॉ. विलास नांदूरकर, उमेश लांडगे, उमा चांभारे, प्रवीण अलटकर, प्रज्ञा बोंडे, जयंत निखारे, गजानन देशमुख व कल्पना चावला युवा महिला शोधकर्ता पुरस्कार प्राप्त डॉ. प्रीति टवलारे का शाल-श्रीफल व 25 हजार रुपए नगद प्रदान कर सत्कार किया.

**तरुण भारत**

# कला माणसाला माणुसकी शिकविते

**डॉ. भोजराज चौधरी यांचे प्रतिपादन**

◆ **अमरावती, ४ मे**

कला माणसाला जिवंत ठेवते व माणुसकी शिकवते. कलेच्या माध्यमातून संपूर्ण समाज सामाजिक, आध्यात्मिक विकास साधू शकतो, असे विचार विद्यापीठातील प्रादेशिक कला विभागाचे समन्वयक डॉ. भोजराज चौधरी यांनी व्यक्त केले. अमरावती विद्यापीठातील आजीवन अध्ययन व विस्तार विभागाद्वारे आयोजित स्नेहसंमेलनाचे उद्घाटनीय भाषण करतांना ते बोलत होते. मंचावर अध्यक्षस्थानी एम. ए. कौन्सिलिंग व सायकोथेरपीचे डॉ. सुरेश रहाटे, विभागाचे संचालक डॉ. श्रीकांत पाटील प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते.



नाट्यकला सादर करताना विद्यार्थी

अध्यक्षीय भाषणात डॉ. सुरेश रहाटे म्हणाले, कलाकाराने कलेच्या माध्यमातून समाज विकासात योगदान दिले पाहिजे. डॉ. श्रीकांत पाटील यांनी विद्यार्थ्यांना स्नेहसंमेलनात सहभाग घेण्याकरिता प्रोत्साहित केले. सांस्कृतिक कार्यक्रमाची सुरुवात दीक्षा सरदार हिने गायिलेल्या गणेश वंदनेने झाली. विभागातील आठही अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांनी गायन, वादन, नृत्य, एकांकिका, नाटक कलाप्रकारांमधून आपली कला सादर केली. योग अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांनी नृत्याच्या माध्यमातून योग प्रात्यक्षिक सादर केले. तसेच एम. ए. छत्रपती शिवाजी महाराज विचार व व्यवस्थापन अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांनी माँ जिजाऊँनी छत्रपती शिवाजी राजे यांना दिलेली शिकवण व संस्कार, पोवाडा व नाटकाच्या माध्यमातून सादर केले.

समारोपीय सत्राच्या अध्यक्षस्थानी विभागाचे संचालक डॉ. श्रीकांत पाटील, प्रमुख अतिथी म्हणून विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. राजीव बोरकर, डॉ. पंजाबराव देशमुख विभागीय अर्थव्यवस्था अध्ययन व नियमन केंद्राचे समन्वयक डॉ. महेंद्र मेटे उपस्थित होते. डॉ. महेंद्र मेटे यांनी स्नेहसंमेलनाच्या यशस्वीतेबद्दल सर्वांना शुभेच्छा दिल्या. डॉ. राजीव बोरकर यांनी उपस्थितांच्या विनंतीस्तव गजल व गीत गायनाने सर्वांची मने जिंकली. अशा प्रकारच्या स्नेहसंमेलनामधून विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळत असल्याचे याप्रसंगी ते म्हणाले. स्नेहसंमेलनाला विभागातील सर्व प्राध्यापकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.

◀ *(तभा वृत्तसेवा)*

**नवराष्ट्र**

# अमरावती विद्यापीठ तिसऱ्या स्थानी

## राष्ट्रीय महिला विद्यार्थी संसद स्पर्धा; कुलगुरूंच्या हस्ते सत्कार

**अमरावती, ब्युरो.** संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या महिला विद्यार्थी संसद संघाने अखिल भारतीय आंतरविद्यापीठ राष्ट्रीय महिला विद्यार्थी संसद स्पर्धा 2024-25 मध्ये चमकदार कामगिरी केली आहे. राष्ट्रीय स्तरावर तिसरे स्थान पटकावले असून, ही प्रतिष्ठित स्पर्धा नुकतीच ओडिशाच्या सेंच्युरियन युनिव्हर्सिटी ऑफ टेक्नॉलॉजी अँड मॅनेजमेंट येथे पार पडली. या स्पर्धेत उल्लेखनिय कामगिरीबद्दल विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते यांनी संघाचे कौतुक केले आणि हे यश विद्यापीठासाठी अभिमानाची बाब असल्याचे सांगितले. तसेच इतर विद्यार्थ्यांसाठीही प्रेरणादायी असल्याचे सांगितले. कुलगुरू कार्यालयात



आयोजित एका विशेष कार्यक्रमात डॉ. बारहाते यांनी संपूर्ण टीमचा सत्कार केला. यावेळी कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. राजीव बोरकर आणि इतर मान्यवर उपस्थित होते. पुरस्कार विजेत्या संघात श्रावणी रोटे, नफीसा शब्बीर हुसेन आणि आरिफा शब्बीर हुसेन यांचा समावेश होता. या संघाचे मार्गदर्शन डॉ. अभिजित महाजन आणि डॉ. मृणाल महाजन यांनी संघ व्यवस्थापक म्हणून काम केले. कुलगुरू डॉ. बारहाते यांनी यावेळी सांगितले की, आमच्या विद्यार्थिनींनी मिळवलेले हे यश केवळ विद्यापीठासाठी अभिमानाची गोष्ट नाही तर इतर विद्यार्थ्यांना राष्ट्रीय स्तरावर उत्कृष्टता प्राप्त करण्यासाठी प्रेरणा देईल.

विदर्भ का प्रमुख हिंदी अखबार, दैनिक
अमरावती मंडल

# समसिध्दी वार्षिक अंक का प्रकाशन और सांस्कृतिक कार्यक्रम व विदाई समारोह का समापन







प्रतिनिधि/ दि. २

**अमरावती** - हाल ही में संत गाडगेबाबा विश्वविद्यालय, अमरावती के पाली एवं बौद्ध धर्म विभाग द्वारा एक कार्यक्रम का आयोजन किया गया. कार्यक्रम की अध्यक्षता प्रोफेसर डॉ. रेखा वानखड़े ने की, विशिष्ट अतिथि थीं. नितिन कोली एवं मुख्य अतिथि प्रो.डॉ. संतोष बंसोड़, प्रो. टी.बी. रामटेके, प्रो.डॉ. मेघा मून, प्रो.एस. अनोमदस्सी भंते, प्रो. सपना मेश्राम, प्रो. अनिता निरगुले, प्रो. कल्पना डोंगरे, बोर्ड ऑफ स्टडीज के अध्यक्ष प्रो. डॉ. श्रीकांत बंसोड़, उपाध्यक्ष डी.वी. गंकरे मंच पर बैठे थे. हर वर्ष की भांति इस वर्ष भी संत गाडगेबाबा विश्वविद्यालय अमरावती एवं तक्षशिला महाविद्यालय अमरावती के सहयोग से समसिध्दी वार्षिक अंक का विमोचन मंच पर विशिष्ट अतिथि द्वारा किया गया.इस अंक में विभिन्न विषयों पर ३० लेखकों के लेख एवं कविताए प्रकाशित हुई हैं.

स्नेहसम्मेलन कार्यक्रम में विभिन्न प्रतियोगिताएं आयोजित की गई जिनमें मुख्य रूप से गायन, कविता, लेखन, प्रश्नोत्तरी, नाटक और सुत्तपथन आदि शामिल थे.प्रतियोगियों को गणमान्य व्यक्तियों द्वारा बैज और प्रमाण पत्र से सम्मानित किया गया. इस कार्यक्रम का संचालन प्रोफेसर वाल्मीक डावले, परिचय सूरज मांडे और आभार प्रदर्शन अरुण कांबले द्वारा किया गया. इस कार्यक्रम में विद्यार्थियों ने गाथा महामानव का यह नाटक प्रस्तुत किया. डॉ. बौद्ध धर्म संपूर्ण विश्व का उद्धार करने वाला है.विशेष अतिथि नितिन कोली ने अपने मार्गदर्शन में कही. मुख्य अतिथि मानव जीवन के लिए आवश्यक शिक्षा प्रदान करने वाले विश्वविद्यालय के पाली बौद्ध धर्म विभाग के प्रो. डॉ. संतोष बंसोड़ ने व्यक्त किये .कार्यक्रम की अध्यक्ष रेखा वानखेड़े ने इस बात पर संतोष व्यक्त किया कि पाली एवं बौद्ध धर्म के विद्यार्थी विभिन्न गतिविधियों में भाग ले रहे हैं.

अंत में द्वितीय वर्ष के सभी विद्यार्थियों को पुष्प एवं पुस्तकें भेंट कर विदाई दी गई.इनमें प्रमुख रूप से प्रोफेसर डॉ. श्रीकांत बनसोड़, प्रोफेसर अशोक वानखड़े, अविनाश गोंडाने, श्रीकृष्ण लांजेवार उज्वला इंगोले, सुजाता बनसोड़, प्रज्ञा पर्वतकर, सुनंदा गवई, श्रद्धा जोशी, जया दांडगे, अमोल तांबे, प्रदीप कालबांडे , हरीश खरबडकर, मुकेश सरदार, अर्चना सुखदेवे, वैष्णवी बहादे ने कार्यक्रम में भाग लिया. कार्यक्रम की सफलता के लिए इंजीनियर उमेश शहारे, एड. महेंद्र तायडे, सलाहकार. अरुण रौराले ,अरुण रामटेके, शिव प्रधान, लक्ष्मणराव कोरे, सविता रामटेके, अनिल हिरेखन, किरण शिंदे, रूपेश वानखड़े, नीलध्वज कांबले, संगीता मंडे, कुमुद गाड़े, सिद्धार्थ गुडधे , संजय पांडे, रवींद्र अंबुलकर, निरंजन चिमुरकर, रूपाली कवितकर, निशाद वानखड़े का विशेष सहयोग मिला. कार्यक्रम का समापन स्वरूचि भोजन के स्वाद के साथ हुआ.

# संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ



**अमरावती :** संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठात स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली. कुलसचिव डॉ. अविनाश असनारे यांनी छत्रपती संभाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन, हारार्पण करुन विद्यापीठाच्या वतीने अभिवादन केले. जयंती कार्यक्रमाला नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळाचे संचालक डॉ. अजय लाड, उपकुलसचिव (आस्थापना) मंगेश वरखेडे यांच्यासह विद्यापीठातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन भांडार विभागातील अधीक्षक धनंजय पाटील यांनी केले.

तरुण भारत

# महिला विद्यार्थी संसद चमूचे राष्ट्रीय स्तरावर यश



कुलगुरूंसोबत पारितोषिक दाखविताना संसद चमूतील विद्यार्थिनी

## स्पर्धेत पटकावला तिसरा क्रमांक

◆ **अमरावती, ४ मे**

अखिल भारतीय आंतरविद्यापीठ राष्ट्रीय महिला विद्यार्थी संसद स्पर्धेमध्ये संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या महिला विद्यार्थी संसद चमूने उत्कृष्ट कामगिरी करत तृतीय क्रमांक पटकावला आहे. ही स्पर्धा सेन्चुरियन युनिव्हर्सिटी ऑफ टेक्नॉलॉजी ॲण्ड मॅनेजमेंट, ओडिसा येथे नुकतीच झाली.

या उल्लेखनीय यशाबद्दल विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते यांनी महिला संसद चमूचे अभिनंदन केले आहे. कुलगुरू कार्यालयात झालेल्या छोटेखानी सत्कार कार्यक्रमात कुलगुरु डॉ. मिलिंद बारहाते यांच्या हस्ते संपूर्ण संसद चमूचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, संचालक डॉ. राजीव बोरकर विद्यार्थी विकास विभाग आणि इतर मान्यवर उपस्थित होते. पुरस्कार प्राप्त चमूमध्ये श्रावणी रोटे, नफिसा शब्बीर हुसेन, आरिफा शब्बीर हुसेन यांचा समावेश होता. या स्पर्धेसाठी डॉ. अभिजित आणि डॉ. मृणाल महाजन यांनी संघ व्यवस्थापक म्हणून काम पाहिले. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या महिला विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय स्तरावर मिळवलेले हे यश निश्चितच प्रेरणादायी असून इतरांनी सुद्धा प्रेरणा घ्यावी असे मत कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी याप्रसंगी व्यक्त केले. ◀(तभा वृत्तसेवा)

नवभारत
1934 से

# मानव मन को समृद्ध बनाती हैं किताबें

## समारोह में डॉ. वैभव मस्के का प्रतिपादन

**शैक्षणिक**



■ अमरावती, ब्यूरो. किताबें मानव मन को समृद्ध बनाती हैं, बौद्धिक क्षमता बढ़ाने में मदद करती हैं और विद्यार्थियों के जीवन को सही दिशा दिखाती हैं. उक्त विचार छत्रपति शिवाजी महाराज विचार एवं प्रबंधन पाठ्यक्रम के प्रोफेसर डॉ. वैभव मस्के ने व्यक्त किए. संत गाडगे बाबा अमरावती विश्वविद्यालय के आजीवन शिक्षा एवं विस्तार विभाग के अंग्रेजी पाठ्यक्रम में पीजी डिप्लोमा संचार कौशल की ओर से विश्व पुस्तक दिवस के अवसर पर अतिथि व्याख्यान के समय वह बोल रहे थे. अध्यक्षता विभाग के निदेशक डॉ. श्रीकांत पाटिल ने की. डॉ. मुस्के ने कहा कि पढ़ना मानव मस्तिष्क को समृद्ध करता है, लेकिन व्यक्ति जिम्मेदार भी बनता है. क्रिकेटर सुनील गावस्कर का उदाहरण देते हुए उन्होंने कहा कि पुस्तकें व्यक्ति को अज्ञानता के अंधकार से ज्ञान के प्रकाश में आने में मदद करती हैं. हमारे पास पढ़ने के लिए समय नहीं है, लेकिन मन की शांति के लिए पढ़ना आवश्यक है. आधुनिक जीवन में तकनीक और सोशल मीडिया के कारण पढ़ने की संस्कृति लुप्त होती जा रही है, लेकिन डॉ.मस्के की बहुमूल्य सलाह है कि छात्रों को पुस्तकालय में जाकर खूब पढ़ना चाहिए. संचालन आदित्य आठवले ने किया, जबकि आभार पल्लवी पाटिल ने माना. व्याख्यान कार्यक्रम में संकाय, गैर-शिक्षण कर्मचारियों और छात्रों ने भाग लिया.

पुण्य नगरी

# विद्यापीठातील कर्मचाऱ्यांशी कुलगुरूंनी साधला संवाद

## विद्यापीठाच्या इतिहासात प्रथमच संवाद सभा

पुण्य नगरी / प्रतिनिधी





**अमरावती :** संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते यांनी नुकताच विद्यापीठाच्या दृकश्राव्य सभागृहात विद्यापीठातील सर्व कर्मचाऱ्यांशी संवाद साधला.

याप्रसंगी व्यासपीठावर प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे उपस्थित होते. विद्यापीठाच्या इतिहासात प्रथमच कुलगुरू आणि कर्मचाऱ्यांमध्ये संवाद सभा पार पडली. कुलगुरू आणि कर्मचारी यांच्यातील संवाद वाढविणे, कर्मचाऱ्यांच्या अडीअडचणी समजून घेणे आणि विद्यापीठाच्या प्रगतीसाठी एकत्रितपणे काम करण्याच्या संधीवर चर्चा करणे, हा संवाद सभेचा मुख्य उद्देश होता. याप्रसंगी बोलताना कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते म्हणाले की, नवीन शैक्षणिक धोरण विद्यापीठाने लागू केले आहे. त्यामुळे ते समजून घेऊन त्याची परिपूर्ण अंमलबजावणी करण्यासाठी सर्वांनी परिश्रम घेण्याची गरज आहे. याप्रसंगी त्यांनी विद्यापीठाची सद्यस्थिती व आगामी योजनांबद्दल तसेच शैक्षणिक आणि प्रशासकीय उद्दिष्टांबद्दल विस्तृत माहिती दिली. यावेळी कर्मचाऱ्यांनीही आपली मते, सूचना आणि काही समस्या कुलगुरूंसमोर मांडल्या. कुलगुरूंनी कर्मचाऱ्यांच्या प्रत्येक समस्या गांभीर्याने ऐकून घेत त्यावर योग्य विचार करून सकारात्मक तोडगा काढण्याचे आश्वासन दिले. कुलगुरूंनी कर्मचाऱ्यांच्या प्रश्नांची थेट उत्तरे देत त्यांच्या शंकांचे निरसन केले. संवाद सभेचे संचालन कुलगुरूंचे स्वीय साहाय्यक रमेश जाधव यांनी केले. सभेला वर्ग २ ते ४ पर्यंतचे सर्व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

The Hitavada

# SGBAU launches new mobile app 'Uni Connect'

■ Amravati Bureau
AMRAVATI, May 26



Dr Milind Barhate, Vice-Chancellor and others inaugurating the app.

IN A significant step towards enhancing student welfare and development, Sant Gadgebaba Amravati University (SGBAU) has launched a new mobile application named 'Uni Connect'.

The app has officially inaugurated by Dr Milind Barhate, Vice-Chancellor of Sant Gadgebaba Amravati University.

The 'Uni Connect' mobile app aims to establish a direct and effective digital connection between the university and students from all five districts under its jurisdiction. It will also serve as a useful platform for college principals, faculty members, non-teaching staff and university administrative departments.

The app offers a wide range of features including college directories, academic programmes offered by the university, study materials, examination schedules, results, previous years' question papers, academic calendars, circulars, notifications, student welfare schemes, research updates, employment opportunities, and scholarships and all accessible with just a single click.

Speaking on the occasion, Dr Milind Barhate emphasised the university's ongoing efforts toward the holistic development of its students. "Along with academic knowledge, our goal is to equip students with career-oriented skills so they can become self-reliant after graduation. This mobile app will also help address student issues more efficiently and promptly," he said.

Recognising the increasing interest of students in technology, the app is designed to be a one-stop solution for both academic and career development resources. It not only provides academic information but also facilitates access to internships and job opportunities in local and national companies, with an option to apply directly through the app. The 'Uni Connect' app is available for download on both Android and iOS platforms. For installation, students are required to register by selecting their college and academic programme, enabling them to receive personalised and relevant information.

Dr Milind Barhate has appealed to all students under the university's jurisdiction to download and utilise the 'Uni Connect' app to make the most of this new digital facility.

दैनिक दिव्य मराठी

# स्किझोफ्रेनिया अज्ञानाचा बळी ठरलेला आजार : डॉ. वसाडकर

## आजीवन अध्ययन विभागात स्किझोफ्रेनियावर व्याख्यान

प्रतिनिधी | अमरावती

आज आपण विज्ञान, तंत्रज्ञान, आणि वैद्यकीय प्रगतीच्या अनेक टप्प्यांवर पोहोचलो आहोत. पण मानसिक आरोग्याविषयी आपल्या समाजात अजूनही अज्ञान, भीती, आणि गैरसमज आहे. स्किझोफ्रेनिया हा याच अज्ञानाचा बळी ठरलेला आजार आहे. हा आजार म्हणजे व्यक्तीच्या विचार प्रक्रियेचा, वास्तव, जाणीवेचा, आणि सामाजिक वागणुकीचा विस्कळीतपणा होय. मात्र, समाजात त्याला कलंक लावला जातो. त्यामुळे अशा रुग्णांसाठी तो अधिक त्रासदायक ठरतो. रोग बरा होत नाही, धोकादायक आहे, अशा प्रकारच्या प्रवृत्तींमुळे अनेक रुग्णांना मोठा मनःस्ताप सहन करावा लागतो. स्किझोफ्रेनियाच्या रुग्णांकडे वेगळ्या नजरेने पाहिले जाते. परिणामी रुग्ण लपवले जातात व योग्य ते उपचार त्यांना मिळत नाहीत, अशी चिंता मानस हॉस्पिटलचे मानसशास्त्रज्ञ व समुपदेशक डॉ. पंकज वसाडकर यांनी व्यक्त केली.

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील आजीवन अध्ययन व विस्तार विभाग आणि मानस प्रबोधनी, अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने \'स्किझोफ्रेनिया : समज-अपसमज\' या विषयावर नुकतेच व्याख्यान झाले. त्यावेळी डॉ. वसाडकर यांनी विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले. अध्यक्षीय भाषणात विभागाचे संचालक डॉ. श्रीकांत पाटील यांनी स्किझोफ्रेनिया म्हणजे तुटलेली ओळख नव्हे, ती नव्याने जोडण्याची संधी आहे. आपण त्यांचा आरसा होऊ. समाजातील प्रत्येकाने मानसिक रुग्णांकडे सहानुभूतीने पाहण्याची गरज आहे. कलंक, टीका, किंवा उपेक्षा करू नये. त्याऐवजी समजूतदारपणाचे वातावरण निर्माण करावे आणि अशा रुग्णांना आधार द्यावा, असे आवाहन केले. व्याख्यानाच्या माध्यमातून विद्यार्थी तसेच समुपदेशक यांना आजाराची लक्षणे, कारणे, उपचारपद्धती व समज-अपसमज यांची सखोल माहिती देण्यात आली. सूत्रसंचालन प्रा. स्नेहल वानखडे, तर आभार प्रदर्शन प्रा. जुबेर खान यांनी केले. यशस्वितेसाठी प्रा. मंजूषा बारबुध्दे, प्रा. शिवानी अग्रवाल, प्रा. अर्चना ढोरे, प्रा. सुरेश राहेटे, प्रा. प्रियंका तायडे यांनी परिश्रम घेतले.

# SGBAU holds anti-violence, anti-terrorism day



Dr Milind Barhate and others offering obeisance to Rajiv Gandhi.

■ Amravati Bureau
AMRAVATI, May 21

SANT Gadge Baba Amravati University (SGBAU) observed anti-terrorism and anti-violence day on the occasion of the death anniversary of Rajiv Gandhi, former Prime Minister and Bharat Ratna awardee.

Dr Milind Barhate, Vice-Chancellor of SGBAU paid tribute to Rajiv Gandhi by offering floral respects and performing a ceremonial worship of his portrait. He also administered the anti-terrorism and anti-violence pledge to all those present for the programme.

The event was graced by Dr Mahendra Dhore, Pro-Vice-Chancellor of SGBAU, Dr Avinash Asnare, Registrar, Dr Shrikant Patil, Director of the Department of Lifelong Learning and Extension, along with other university officials and staffers. All the present officers and staffers have offered floral obeisance to Rajiv Gandhi on the occasion.

## दैनिक दिव्य मराठी

दिलासा • स्तनदा माता विद्यार्थिनींसाठी अमरावती विद्यापीठाचा महत्त्वाचा निर्णय

# बाळाला स्तनपान करण्यासाठी मिळणार परीक्षेदरम्यान २० मिनिटांचा जादा वेळ

प्रतिनिधी | अमरावती

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाने नुकताच एक महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. या निर्णयानुसार विद्यापीठाच्या परीक्षांमध्ये स्तनदा माता विद्यार्थिनींना विशेष सुविधा मिळणार आहेत. विद्यापीठाने ७ मे रोजी याबाबतची अधिसूचना जारी केली आहे. ज्या माता आपल्या बाळांना स्तनपान करतात, अशा विद्यार्थिनींना परीक्षेदरम्यान काही प्रमाणात अतिरिक्त वेळ आणि आवश्यक सुविधा पुरवल्या जाणार आहेत. नियमानुसार, परीक्षा सुरू झाल्यानंतर एक तासाने इतर विद्यार्थ्यांना ज्याप्रमाणे खोली सोडण्याची परवानगी दिली जाते, त्याचप्रमाणे स्तनदा मातांना त्यांच्या बाळाला स्तनपान करण्यासाठी खोली सोडता येणार आहे. यासाठी त्यांना प्रश्नपत्रिका सोडवण्यासाठी २० मिनिटांचा अतिरिक्त वेळ दिला जाईल. उदाहरणार्थ, जर परीक्षा तीन तासांची असेल, तर स्तनदा मातांना ३ तास आणि २० मिनिटे मिळतील.

### बाळाचे वय ६ महिन्यांपेक्षा कमी असेल तरच सुविधा

सर्व स्तनदा मातांना त्यांच्या प्रवेशपत्रिकेवरील आणि उत्तरपत्रिकेवरील सूचनांचे काटेकोरपणे पालन करणे अनिवार्य असेल. ही सुविधा केवळ ज्यांच्या बाळांचे वय सहा महिन्यांपेक्षा कमी आहे अशाच स्तनदा माता विद्यार्थिनींना मिळणार आहे. मात्र सुविधेचा लाभ घेण्यासाठी मातांना बाळाचे जन्म प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक असेल.

बाळाची काळजी घेण्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित विद्यार्थिनीच्या कुटुंबीयांची राहील. स्तनपान करण्यासाठी परीक्षा केंद्रावर उपलब्ध हिरकणी कक्षात स्तनदा मातांनाच प्रवेश दिला जाईल. बाळासाठी आवश्यक असलेल्या साहित्या व्यतिरिक्त इतर कोणतीही आक्षेपार्ह वस्तू कक्षात आणण्यास मनाई असेल. बाळाला स्तनपान करून परतल्यानंतर, महिला पर्यवेक्षक, परीक्षा प्रमुख हे त्यांची तपासणी करतील. त्यानंतरच त्यांना परीक्षा हॉलमध्ये प्रवेश दिला जाईल.

शिक्षण आणि मातृत्व या दोन्ही जबाबदाऱ्या पार पाडण्यासाठी हा निर्णय सहायक ठरेल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते यांनी घेतलेल्या या निर्णयामुळे स्तनदा माता विद्यार्थिनींमध्ये आनंद पसरला असल्याच्या भावना परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. नितीन कोळी यांनी व्यक्त केल्या.

## दैनिक भास्कर

# भारत को युद्ध की नहीं, बुद्ध की जरूरत : बनसोड

### अमरावती विश्वविद्यालय के बौद्ध अध्ययन केन्द्र में बुद्ध जयंती पर हुआ कार्यक्रम

भास्कर डेस्क | अमरावती




भारत को युद्ध की नहीं बल्कि बुद्ध की जरूरत है। इस आशय का मत संत गाड़गेबाबा अमरावती विश्वविद्यालय के बौद्ध अध्ययन केन्द्र द्वारा आयोजित कायक्रम में डॉ. संतोष बनसोड ने किया। उनके मुताबिक भारत शांतिप्रिय देश है और समूचे विश्व को वसुधैव कुटुंबकम वाली संस्कृति को बढ़ावा दिया है। वे संत गाड़गे बाबा अमरावती विश्वविद्यालय के बौद्ध अध्ययन केंद्र में आयोजित बुद्ध जयंती समारोह में बोल रहे थे। इस अवसर पर भगवान गौतम बुद्ध की प्रतिमा की पूजा की गई, मोमबत्तियां जलाई गईं तथा बुद्ध वंदना की गई। डॉ. संतोष बनसोड ने कहा कि भारत में तथागत भगवान गौतम बुद्ध ने 2500 वर्ष पूर्व प्रेम का संदेश और अहिंसा का विचार दिया था। भारत को आज इसी सोच की जरूरत है। इसलिए भारत युद्ध नहीं, बल्कि बुद्धिमत्ता चाहता है। मौके पर डॉ. रत्नशील खोबरागड़े, डॉ. प्रेमानंद तिडके, डॉ. अनिल नाइक, डॉ. कपिल कांबले, प्रो. रामचन्द्र वरघट, प्रभाकर भाले आदि उपस्थित थे. बौद्ध अध्ययन केंद्र के समन्वयक प्रो. नागले ने परिचय दिया, मैत्रेय खोबरागड़े ने संचालन तथा कामिनी गुडधे ने आभार प्रदर्शन दिया।

ाच आपला

मातृभूमि

# सौर ऊर्जा व ऊर्जा संवर्धन क्षेत्रात विद्यापीठाचे दिशादर्शक कार्य

## कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांची माहिती

### ४४ लाख रुपये अर्थसहाय्य मिळविण्यात यश





**प्रतिनिधी /२२ मे**

**अमरावती :** संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाने सोलर एनर्जी कॉर्पोरेशन ऑफ इंडिया, नवी दिल्ली या केंद्र शासनाच्या संस्थेमार्फत वर्ष २०१८ मध्ये ५७६ किलो वॅट क्षमतेचा सौर ऊर्जा प्रकल्प स्थापन केलेला असून सौर उर्जा व उर्जा संवर्धन क्षेत्रात विद्यापीठाचे कार्य दिशादर्शक असल्याचे मत कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी केले.

विद्यापीठाच्या एकूण वीज वापराच्या ५५ ते ६० टक्के वीज ही या प्रकल्पातून निर्मित होत असूने ३.६२ रूपये प्रति युनिट वीज दर विद्यापीठासाठी निश्चित केला आहे. वीज वितरण कंपनीचा दर ११.५२ रूपये प्रति युनिट असून सौर प्रकल्पातून निर्मित होणारी वीज अतिशय स्वस्त दरात विद्यापीठाला मिळत आहे. मागील सहां वर्षात जवळपास तीन कोटी रुपयांची मोठी आर्थिक बचत झालेली आहे. याशिवाय निसर्ग संवर्धनासाठी सुद्धा विद्यापीठाने हातभार लावलेला असून सौर ऊर्जा प्रकल्पामुळे ४०८१ टन एवढ्या कार्बन-डाय-ऑक्साइडचे उत्सर्जन नियंत्रित झाले आहे.

**वीज बचतीचे यंत्र व उपकरणांचा वापर**-मागील सहा वर्षात वीज बचत करणारे बीएलडीसी सिलिंग पंखे, एलईडी ट्यूबलाइट आणि पथदिवे, पंचतारांकित यंत्रे व उपकरणे यांचा वापर विद्यापीठाने वाढविलेला असून त्यामुळे मोठ्या प्रमाणात वीज बचत झाली आहे. विद्यापीठाचा एकुण वीज वापर १४.६४ लक्ष युनिट वरुन २०२४-२५ मध्ये तो १३. ५७ लक्ष युनिट झाला आहे. मागील सहा वर्षात इमारतींच्या, यंत्रे व उपकरणांच्या तसेच सभा व कार्यक्रमांच्या संख्येत मोठ्या प्रमाणात वाढ झालेली असतांना सुध्दा विद्यापीठाची वीज वापरात झालेली घट उल्लेखनीय आहे.

विद्यापीठातील एकूण लाईट पैकी ८१ टक्के एलईडी लाईट असून ५० टक्के बीएलडीसी सिलिंग पंखे बसविण्यात आलेले आहे. शंभर टक्के उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी निधी मिळण्याकरिता वित्तीय संस्थांकडे विद्यापीठाने प्रस्ताव सादर केला असून सी.एस.आर. फंडासाठी प्रयत्न सुरू आहेत. विद्यापीठाला महाऊर्जाकडून वीज बचत करणारे एलईडी लाईट, बीएलडीसी सिलींग पंखे, पंचतारांकित वातानुकूलन यंत्रे लावण्यासाठी आतापर्यंत दोन टप्प्यांत ४४ लाख रुपयांचे वित्तीय साहाय्य प्राप्त झालेले आहे. सौर ऊर्जेचा वापर जास्तीत जास्त करण्याच्या दृष्टीने सातत्याने प्रयत्नशील असून विद्यापीठ परिसरातील निवासी इमारतींवर जवळपास २०००० लीटर क्षमतेचे सौर बंब बसविण्यात आलेले आहे. ऊर्जा अंकेक्षणाच्या अभ्यासात्मक अहवालानुसार सौर ऊर्जा प्रकल्पाची क्षमता वाढविणे, ऊर्जा बचत तसेच ऊर्जा संवर्धन क्षेत्रात अधिक प्रभावीपणे कार्य करण्याचा विद्यापीठाचा मानस आहे. वीज बचत करण्यासाठी आणि विजेचा गैरवापर टाळण्यासाठी कुलगुरू डॉ.मिलींद बारहाते यांनी विभागांतर्गत विजेची बचत करण्यासाठी आणि विजेचा गैरवापर टाळण्यासाठी सर्वांना आवाहन केले आहे. विद्यापीठाचा सौर ऊर्जा प्रकल्प आणि विद्युत उपकेंद्र हे आदर्श प्रकल्प असून या ठिकाणी वीज वितरण कंपनीचे प्रशिक्षणार्थी अभियंता यांची चमू तसेच इतर विद्यापीठातील मंडळी आणि इतर मान्यवर नेहमीच भेट देऊन या प्रकल्पाची माहिती जाणून घेतात व विद्यापीठाच्या कार्याची प्रशंसा करतात.विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांच्या नेतृत्वाखाली आणि प्र-कुलगुरु डॉ.महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, विविध प्राधिकारीणीच्या मार्गदर्शनाखाली विद्यापीठाचे कार्यकारी अभियंता श्री शशिकांत रोडे, विद्युत कक्षाचे उपअभियंता श्री राजेश एडले, कनिष्ठ अभियंता आकाश सोळंके व अभियांत्रिकी विभागातील सर्वच कर्मचा-यांचे प्रयत्न फलदायी ठरले आहेत.

मराठी दैनिक

वृत्त केसरी

## कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांचे हस्ते

# विद्यापीठाचे 'युनी कनेक्ट' मोबाईल ॲप लॉंच



**प्रतिनिधी/ वृत्त केसरी**

**अमरावती , २२ मे:** संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे 'युनी कनेक्ट' हे मोबाईल ॲप कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांचे हस्ते बुधवारी 21 मे, रोजी लॉंच करण्यात आले आहे.

मोबाईल ॲपमुळे आता संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ परिक्षेत्रातील पाचही जिल्ह्यांमधील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांशी जुळ्ले असून विद्यार्थ्यांसह महाविद्यालयांचे प्राचार्य, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी त्याचबरोबर विद्यापीठाच्या सर्व शैक्षणिक व प्रशासकीय विभागप्रमुख, कर्मचा-यांनाही या मोबाईल ॲपमुळे मोठी सुविधा निर्माण झाली आहे. सदर मोबाईल ॲपमध्ये महाविद्यालयांची यादी, महाविद्यालये, विद्यापीठाच्या विभागाव्दारे उपलब्ध करुन देण्यात आलेले अभ्यासक्रम, अध्ययन, परीक्षांची वेळापत्रके, निकाल, मागील परीक्षांच्या प्रश्नपत्रिका, शैक्षणिक कॅलेंडर, परिपत्रके, सूचना, उपक्रम, विविध विद्यार्थी हितार्थ योजना, संशोधन, रोजगार, शिष्यवृत्ती आदींची विस्तृत माहिती अगदी सहजपणे एका क्लिकवर विद्यार्थ्यांना उपलब्ध होईल. विद्यार्थ्यांची तंत्रज्ञानाबद्दल असलेली आवड लक्षात घेता सदर ॲपव्दारे आवशयक ती शैक्षणिक आणि करिअर विकासासाठीची संसाधने एकाच प्लॅटफॉर्मवर एकत्र आणण्याचे यामागील उद्दिष्ट आहे. सदर ॲप केवळ शैक्षणिक माहितीपुरते मर्यादित न राहता विद्यार्थ्यांच्या करिअर विकासासाठी उपयुक्त संसाधने प्रदान करते. स्थानिक तसेच बाहेरील कंपन्यांमध्ये इंटर्नशिप, नोकरीच्या संधी शोधण्याची आणि त्यासाठी अर्ज करण्याची सुविधा देखील या ॲपवर उपलब्ध आहे. याप्रसंगी कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते म्हणाले, मोबाईलवरील गुगल प्ले स्टोरमध्ये 'युनीकनेक्ट' ॲप उपलब्ध असून विद्यापीठ परिक्षेत्रातील सर्व विद्यार्थ्यांनी हे ॲप आपल्या मोबाईलमध्ये डाऊनलोड करावे.

# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

## विद्यावार्ता ई - मासिक

**मार्गदर्शक**



**श्री सी. पी. राधाकृष्णन**
मा. राज्यपाल तथा कुलपती
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ



**डॉ. मिलींद बारहाते**
मा. कुलगुरू
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ



**डॉ. महेंद्र ढोरे**
मा. प्र-कुलगुरू
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

**प्रकाशक**



**डॉ. अविनाश असनारे**
कुलसचिव
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

**संपादक**



**डॉ. विलास नांदुरकर**
जनसंपर्क अधिकारी
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ